www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

दैं.युवक आधार करीता प्रतिनधिी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 224 वा सोमवार दि. 28 एप्रिल २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या पाटोदा तालुकाध्यक्षपदी हमीदखान पठाण यांची फेर निवड

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)**

– सामाजिक कार्यात नेहमीच पुढाकार घेणारे व तसेच डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या मार्गदर्शनाखाली भ्रष्टाचाराच्या विरोधात सातत्याने आवाज उठवणारे पाटोदा येथील पत्रकार हमिदखान पठाण यांची भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या पाटोदा तालुकाध्यक्षपदी पुणे येथील बैठकीत फेर निवड करण्यात आली. या निवडीची अधिकृत घोषणा समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री.चंद्रकांत उदगुडे पाटील व महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष श्री. शांताराम खुडे यांनी पुणे येथे एका विशेष बैठकीत त्यांनी नियुक्तीपत्र देऊन पत्रकार हमिदखान पठाण यांच्या सामाजिक कार्याची, जनहितासाठी केलेल्या कामाची तसेच भ्रष्टाचाराविरोधातील प्रभावी भूमिकेची प्रशंसा करत, त्यांना ही फेर जबाबदारी दिली आहे. हमिदखान पठाण गेल्या अनेक वर्षांपासून पाटोदा तालुक्यातील पैठण ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग बोगस व अर्धवट कामाचा लढा आणि भ्रष्टाचार विरोधात सतत कार्यरत आहेत. त्यांच्या भ्रष्टाचार विरोधी चळवळीला बळ मिळेल, असा विश्वास समितीने व्यक्त केला आहे. या निवडी मुळे पाटोदा तालुक्यातील भ्रष्टाचार विरोधी लढ्याला नवसंजीवनी मिळेल, अशी आशा व्यक्त होत आहे. त्यांच्या या निवडचे स्थानिक नागरिक व कार्यकर्त्यांतून अभिनंदन होत असून त्यांच्या वर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



# मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने अंतर्गत जिल्ह्यातील 800 लाभार्थ्यांची रेल्वेने अयोध्येला रवाना

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

आपल्या घरातलं कुटुंब हे प्रभू रामचंद्राच्या दर्शनाला निघालेले आहे. आपल्याला आशीर्वाद मागण्यासाठी हे सर्वजण निघालेले आहेत. अशा पध्दतीची वागणूक ही सर्व ज्येष्ठांना मिळाली पाहिजे. कुठच्याही ज्येष्ठ नागरिकाला त्रास होणार नाही, त्यांना कोणतेही कमतरता भासणार नाही, याची काळजी अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घ्यावी, असे संगून, सुरक्षित जा, सुरक्षित या, अशा शुभेच्छा पालकमंत्री डॉ. सामंत देत रत्नागिरी रेल्वे स्थानकांतून मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने अंतर्गत सुटणाऱ्या पहिल्या रेल गाडीला पालक मंत्री डॉ.उदय सामंत यानी समारंभ पूर्वक हिरवा झेंडा दर्शविला. रत्नागिरी रेल्वे स्थानकावरुन 800 ज्येष्ठ नागरिकांना अयोध्याला तीर्थ दर्शनासाठी घेऊन जाणारी कोकणातील पहिली रेल्वे आज रवाना झाली. पालकमंत्री डॉ. सामंत यांनी फित कापून या उपक्रमाचा शुभारंभ आज केला. त्याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अपर




जिल्हाधिकारी भाऊसाहेब गलांडे, समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त दीपक घाटे, जनसंपर्क अधिकारी संजय भोसले, असिस्टन्ट मॅनेजर टुरिझम संजय शर्मा, प्रादेशिक व्यवस्थापक शैलेश बापट, प्रांताधिकारी जीवन देसाई, राहूल पंडित, जि.प. माजी सभापती बाबू म्हाप, माजी नगराध्यक्ष बंड्या साळवी, बिपीन बंदरकर आदी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. सामंत पुढे म्हणाले, जातानाचा अडीच दिवसाचा प्रवास आणि येतानाचा अडीच दिवसाचा प्रवास आहे. जसे घरामध्ये मुले आईवडीलांना जी सेवा करतात, मुले ज्याप्रमाणे आईवडीलांची काळजी घेतात, त्यापेक्षा जास्त काळजी आपण सर्वांनी या सगळ्या ज्येष्ठांची घ्या. त्यांच्या आयुष्यातला हा आनंदाचा दिवस आहे. जे आपल्या सर्वांचे स्वप्न होते ते देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पूर्ण केले. त्या राम मंदिराचे, त्या रामाचे दर्शन घेण्यासाठी अयोध्याला रवाना होत आहात. आपल्या तब्येतीची काळजी घेण्यासाठी आपल्यासोबत डॉक्टरांसोबत आरोग्य पथक पाच दिवस आपल्या सोबत राहणार आहे. आपण स्वतःही आपली काळजी घ्या. तसेच मला पूर्ण खात्री आहे, कर्मचारी अधिकारी आपण सगळे आमचे आईवडील असल्याप्रमाणे आपल्या सर्वांची काळजी घेतील, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. ते म्हणाले, 60 वर्षे पूर्ण झालेल्या ज्येष्ठ नागरिकांना मुलांवर अवलंबून न राहता तीर्थ दर्शन व्हावे, यासाठी प्रत्येकी 30 हजार देऊन तीर्थ दर्शन योजना करावी, हा निर्णय तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी घेतला होता. आज आपल्या जीवनतला सुवर्ण अक्षराने लिहून ठेवण्यासारखा क्षण आहे. कारण, कोकणातून पहिली रेल्वे आपल्या सर्वांना घेऊन अयोध्याला रवाना होते. पाण्याची, जेवण्याची व्यवस्था चांगली असली पाहिजे. स्वच्छताही " चांगली असली पाहिजे. अजून निधीची आवश्यकता लागत असेल तर जिल्हा नियोजन समितीमधून ज्येष्ठांसाठी आजच मंजूर करायला आपण तयार आहोत, परंतु 1 तारखेला झेंडा वंदनासाठी रत्नागिरीला येईन तेव्हा, घरच्यांपेक्षा जास्त चांगली काळजी या प्रवासात आमची घेतली गेली, असे मला सर्व ज्येष्ठांनी सांगितले पाहिजे. मला जमलं तर पुन्हा येत असताना तुमच्या स्वागताला देखील तुमचा मुलगा म्हणून या रेल्वे स्टेशनला मी उपस्थित राहण्याची प्रयत्न करीन. मला शक्य झाल नाही तर अधिकारी, माझे पदाधिकारी नक्की उपस्थित राहतील. सुरक्षित जा, सुरक्षित या, अशा शुभेच्छा पालकमंत्री डॉ. सामंत यांनी दिल्या.यावेळी पालकमंत्री डॉ. सामंत यांनी दोन तीन दिवसांपूर्वी काश्मीरला जो प्रकार घडला त्याचा जाहीर निषेधव्यक्त केला. यावेळी तीर्थ दर्शन योजनेचा लाभ मिळालेल्या ज्येष्ठ नागरिकांचा तुळशीमाळ देऊन सत्कार करण्यात आला. प्रातनिधिक स्वरुपात पालकमंत्री महोदयांच्या हस्ते अयोध्याला जाण्यासाठीची रेल्वे तिकीटही देण्यात आली.

## पेट्रोलच्या टाकीचा कॉक तूटल्याने दुचाकीने घेतला पेट

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

नवीन पनवेल शहरातील रेल्वे स्थानकासमोर एका दुचाकीने हातगाडीला धडक दिल्याने दुचाकी रस्त्यावर स्लिप झाली. यामुळे या दुचाकीच्या पेट्रोलच्या टाकीचा कॉक तुटला आणि पेट्रोल रस्त्यावर सांडल्याने दुचाकीने पेट घेतला. सुदैवाने यात जीवितहानी झाली नाही. नवीन पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात बेकायदेशीर हातगाडयांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली आहे. महापालिकेचे अतिक्रमण विभाग या हातगाड्यांवर कारवाई करण्यात कुचकामी ठरत आहे. शुक्रवारी 25 एप्रिल रोजी रात्री नऊच्या सुमारास सावंत कुटुंबीय कळवा, ठाणे वरून नवीन पनवेल येथे त्यांच्या नातेवाईकाकडे दुचाकीवरून वाढदिवसासाठी आले होते. यावेळी नवीन पनवेल रेल्वे स्थानकासमोर आले असता रस्त्याच्यामध्ये हातगाडी आल्याने त्यांच्या होंडा दुचाकीने या हातगाडीला धडक दिली. धडक दिल्याने दुचाकी स्लिप झाली. यावेळी दुचाकीवर असलेले सावंत कुटुंबीय खाली पडले. झालेल्या अपघातात दुचाकीचा पेट्रोलच्या टाकीजवळ असलेला कॉक तुटल्याने पेट्रोल खाली सांडले आणि दुचाकीने पेट घेतला. त्यानंतर हातगाडी चालक हातगाडी घेऊन पळून गेला. यावेळी आजूबाजूचे नागरिक जमा झाले. आणि त्यांनी ही आग विझवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर अग्निशामक दलाची गाडी घटनास्थळी दाखल झाली. सुदैवाने यात कोणालाही दुखापत झालेली नाही. मात्र दुचाकी जळाली आहे. या घटनेमुळे शहरातील बेकायदा सुरू असलेल्या हातगाड्यांचा विषय ऐरणीवर आला आहे.



## रास्ता रोको आंदोलन स्थगित मुरबाड



**दैनिक युवक आधार**
**कल्याण/रशीद शेख**

नुकतच मुरबाड तालुक्याचे तहसीलदार यांचे कार्यालयामध्ये उपविभागीय अधिकारी कल्याण गुजर यांच्या समवेत कल्याण नगर मुरबाड माळशेज महामार्गाच्या बाधित शेतकऱ्यांच्या बाबत शेतकरी संघर्ष समिती सोबत सभेचे आयोजन करण्यात आले होते. सदर सभेमध्ये प्रांत गुजर , मुरबाडचे तहसीलदार अभिजित देशमुख ,पोलीस उपनिरीक्षक शिंदे ,सहाय्यक पोलीस निरीक्षक चकोर ,राष्ट्रीय महामार्गाचे प्रतिनिधी व भूमीअभिलेख चे प्रतिनिधी हे सर्व सभेस उपस्थित होते. सदर सभेमध्ये शेतकऱ्यांच्या समस्या संदर्भात जवळजवळ दोन तास सकारात्मक चर्चा करण्यात आली. प्रांत यांनी पाच दिवसांचा अवधी दिलेला असून, शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न निकाली काढण्यासंदर्भात सकारात्मक आश्वासन देण्यात आले आहे. तसेच काश्मीर या ठिकाणी घडलेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे, शहीद झालेल्या पर्यटकांमुळे सध्या संपूर्ण देशात व महाराष्ट्रात गंभीर वातावरण आहे , शासकीय अधिकारी वर्गामध्ये ताणतणावाचे वातावरण निर्माण झालेले आहे. तसेच उपरोक्त घटना गंभीर असल्यामुळे शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी आंदोलनाच्या भूमिकेतून सरकारपुढे जाणे गैर आहे.

या सर्व कारणांमुळे उपस्थित सर्व बाधित शेतकरी बांधव व शेतकरी संघर्ष समिती यांच्या चर्चेतून रोजी आयोजित केलेला रस्ता रोको आंदोलन आठ दिवसांसाठी स्थगित करण्यात आलेला आहे.

तोपर्यंत बाधित शेतकऱ्याला भरपाई मिळण्यासाठी प्रांत यांनी मांडलेल्या सर्व समस्या व प्रश्न निकाली काढू असे आश्वासन दिलेले आहे. अशी माहिती प्रकाश पवार सर अध्यक्ष शेतकरी संघर्ष समिती यांनी दिली आहे.

## गुन्हे शाखा कक्ष 2 पनवेलने घेतले मोटार सायकल चोरट्यास ताब्यात ; 11 गाड्या हस्तगत

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, वार्ताहर**

पनवेल रेल्वे स्टेशन परिसर तसेच इतर विभाग परिसरातून मोठ्या प्रमाणात गेल्या काही महिन्यापासून दुचाकी वाहने चोरीस जाण्याचे प्रकार वाढले होते. या अंतर्गत गुन्हे शाखा कक्ष 2 पनवेल हे सदर चोरट्याचा शोध घेत असताना तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराद्वारे सदर गुन्हेगार हा पळस्पे परिसरात असल्याची माहिती मिळाल्याने त्यांच्या पथकाने तेथे सापळा रचून त्याला ताब्यात घेतले असता त्याच्याकडून आतापर्यंत 11 दुचाकी चोरीच्या गाड्या हस्तगत करण्यात आल्या आहेत. पनवेल शहर पोलीस ठाणे, कामोठे पोलीस ठाणे, खांदेश्वर पोलीस ठाणे अंतर्गत मोटार सायकल चोरीस जाण्याचे प्रमाण गेल्या काही महिन्यापासून वाढले होते. या संदर्भात सपोआ गुन्हे शाखा अजयकुमार लांडगे, यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष 2 पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गवळी, सपोनि प्रवीण फडतरे, अजित कानगुडे, पोउपनि प्रताप देसाई, मानसिंग पाटील, माधव इंगळे, पोउपनि अभयसिंह शिंदे, पोउपनि माधव इंगळे, पोहवा रमेश शिंदे, अनिल पाटील, प्रशांत काटकर, मधुकर गडगे, तुकाराम सुर्यवंशी, निलेश पाटील, दिपक डोंगरे, इंद्रजीत कानु, रुपेश पाटील, सागर रसाळ, अजित पाटील, पोलीस नाईक अजिनाथ फुंदे, पोलीस शिपाई विक्रांत माळी, लवकुश शिंगाडे आदींच्या पथकाने सदर आरोपीचा शोध घेत असताना सदर आरोपी आदित्य ठाकूर (22) हा पळस्पे परिसरात असल्याची गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाल्याने त्याला सापळा रचून ताब्यात घेतले असता त्याने सदर गुन्ह्याची कबूल दिली असून त्याने आतापर्यंत 11 दुचाकी चोरीची वाहने दिली आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने पनवेल शहर पोलीस ठाण्यातील 7 वाहने, 1 कामोठे पोलीस ठाणे, 1 खांदेश्वर पोलीस ठाणे, 1 पेण पोलीस ठाणे, आदींचा समावेश आहे. या आरोपीच्या अटकेमुळे अजूनही चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.



# पनवेल प्रेस क्लब संस्थेच्या अध्यक्षपदी देविदास गायकवाड यांची निवड





**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (प्रतिनिधी )**

पनवेल प्रेस क्लब या संस्थेच्या अध्यक्षपदी देविदास गायकवाड तर उपाध्यक्षपदी सागर पगारे यांची निवड करण्यात आली शनिवारी तारीख २६ एप्रिल रोजी नवीन पनवेल येथील श्री संत साईबाबा प्राथमिक विद्यालयात संस्थेची २० वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संतोष घरत यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली यामध्ये सर्वानुमते नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. पनवेल प्रेस क्लब ही दोन हजार सहा मध्ये स्थापन झालेली नोंदणीकृत संस्था आहे. संस्थेच्या सद्यस्थितीतील संचालक मंडळाची मुदत ही ३० एप्रिल २०२५ रोजी संपत आहे. त्यामुळे संस्थेच्या पुढील पाच वर्षासाठी नवीन कार्यकारणीची निवड होणे गरजेचे होते त्या दृष्टीने संस्थेने वासुदेव गांधेले यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात



आली. त्यांनी मतदान प्रक्रियेच्या दृष्टीने संपूर्ण निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. मात्र फक्त ११ सभासदांचेच अर्ज दाखल झाल्याने सर्व सभासद हे बिनविरोध निवडून आल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी गांधेले यांनी घोषित केले. त्यानंतर संस्थेच्या पार पडलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये नवीन कार्यकारणीची तसेच पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली यामध्ये संस्थेच्या अध्यक्षपदी देविदास गायकवाड यांची निवड करण्यात आली तर उपाध्यक्षपदी सागर पगारे यांची निवड करण्यात आली संस्थेच्या सचिव पदी भागवत अहिरे तर सहसचिव पदी सुनील पाटील यांची निवड करण्यात आली. संस्थेच्या खजिनदारपदी शैलेश चव्हाण तर सहखजिनदारपदी प्रसाद परब यांची निवड करण्यात आली तर सदस्य म्हणून संतोष घरत, विकास पाटील, राजेश कदम , सनिप कलोते , राजेंद्र सदावर्ते, सुनील भुजबळ , विजय कुमार जंगम , अनिल पाटील, चंद्रकांत मढवी , निवृत्ती पाटील, किरण बाथम, राहुल बोरडे , रोहित घाडगे, बल्लाळ पाटील, हेमंत लबाडे यांची निवड करण्यात आली. पनवेल प्रेस क्लब ने गेल्या २० वर्षापासून पत्रकारांसाठी व्याख्यान माला, आरोग्य शिबिर, कार्यशाळा प्रशिक्षण, तसेच समाजातील प्रत्येक घटकाला पान २ वर



## उरण तालुक्यातील नवघर गावचे हेमंत कडू यांना हिप्नोथेरपीमध्ये डॉक्टररेट पदवी प्रदान.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

अयोध्या, २७ एप्रिल २०२५ अयोध्येतील पंडित दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठात आज झालेल्या विशेष समारंभात हेमंत कडू यांना हिप्नोथेरपी या क्षेत्रात "डॉक्टररेट" म्हणजेच मानद पदवी प्रदान करण्यात आली. त्यांच्या हिप्नोथेरपी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत विद्यापीठाने त्यांना हा सन्मान दिला आहे. मानसिक आरोग्य आणि हिप्नोथेरपीच्या माध्यमातून समाजासाठी केलेल्या कार्याची प्रशंसा यावेळी विद्यापीठ प्रशासनाने केली. यावेळी मुख्य अतिथी पुर्व कुलपति रानी लक्ष्मीबाई केंद्रीय कृषी विश्वविद्यालय झांशी पद्मश्री डॉ. अरविंद कुमार,कुलपति प.दिनदयाल उपाध्याय हिंदी विध्यापीठ अध्यक्षता डॉ. इन्दु भुषण मिश्रा,सुप्रसिध्द कथा वाचिका वृन्दावन धाम मथुरा मुख्य वक्ता सुश्री दिपा मिश्रा,राष्ट्रीय पर्यावरणविद आणि वर्ड रेकॉड धारी बागबहरा जिल्हा महासमुंद(छत्तीसगढ) विशिष्ट अतिथि डॉ.विश्वनाथ पाणिग्रहि या मान्यवरांच्या उपस्थितीत सदर पदवी प्रधान करण्यात आली. मान्यतेमुळे हेमंत कडू यांच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विविध क्षेत्रातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून, अनेकांनी त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.







# आई-वडिलांसह गुरुजनांचा सन्मान करा- डॉ. संजय भावे

## यूपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या डीबीजेचा माजी विद्यार्थी सिद्धार्थ जयंत यांचा सन्मान

### डीबीजे महाविद्यालयात २०२४- २५ शैक्षणिक वर्षाचा दीक्षांत समारंभ

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण (प्रतिनिधी)--**: परिश्रमाशिवाय पर्याय नाही, यशाला शॉर्टकट नाही. फक्त कष्ट करा, यश नक्की मिळेल. पैशाने पैसेवाला होता येतं, पण श्रीमंत होता येत नाही. पैशाने कार विकत घेता येते, संस्कार नाहीत. पैशाने समृद्धी, संपन्नता येईल, पण समाधानाचे काय? आई-वडील, गुरु यांचा सन्मान करा. देह आणि देव याच्यामध्ये देश आहे, याच भान कायम ठेवा आणि देशाला कधीही विसरू नका. देशाला उन्नत करण्यासाठी मेहनत घ्या, असा सल्ला दापोली येथील कोकण कृषि विद्यापिठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे यांनी केले. नवकोकण एज्युकेशन सोसायटीच्या डीबीजे महाविद्यालयात २०२४-२५ शैक्षणिक वर्षाच्या दीक्षांत समारंभात डॉ. भावे बोलत होते. या वेळी यूपीएससी परीक्षेत ३७८ वा रँक मिळवून यश प्राप्त करणारा डीबीजेचा माजी विद्यार्थी सिद्धार्थ जैन, नवकोकण




एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन मंगेश तथा बाबू तांबे, प्राचार्य डॉ. माधव बापट, उपप्राचार्य सी. सी आठवले, उपप्राचार्य डॉ. आर. एम मोरे, कुलसचिव अनिल कलकुटकी, विद्यापीठ परीक्षा समन्वयक एस. के. नामदास यांच्यासह सर्व संचालक व पालक, विद्यार्थी उपस्थित होते. या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. भावे म्हणाले, आयुष्यात मोठे व्हायचं असेल, तर सेलिब्रिटींकडे बघून मोठे व्हायला शिका. खऱ्या अर्थाने शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवायचं असेल, संस्कार करायचे असतील, तर गुरु गुरुकुल पद्धतीकडे वळायला हवं. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, मोबाईल बाजूला ठेवा. आई-वडिलांना कधीही विसरू नका. आई-वडील गेल्यानंतर आपल्याला खऱ्या अर्थाने त्यांची किंमत कळते, असे त्यांनी सांगितले. आपला देश हा संस्कृतीवरून ओळखला जातो. त्यामुळे संस्कृती विसरू नका. आईस्क्रीम वितळायच्याऐवजी ते खाणं योग्य, असे मानणारी आजची पिढी, परंतु मेणबत्तीसारखं हळुहळू जळून इतरांना प्रकाश द्या, अशा शब्दात त्यांनी मार्गदर्शन केलं. ऐकायला शिका, विचार करून बोलायला शिका, खूप अभ्यास करा, कधीही मैदान सोडू नका, अपयश हा शब्द आपल्या शब्दकोशात ठेवू नका, असा सल्लाही त्यांनी या वेळी विद्यार्थ्यांना दिला. या वेळी डीबीजे महाविद्यालयातील सर्व शाखांमध्ये टॉपर्स असणाऱ्या 33 विद्यार्थ्यांचा डॉ. भावे, सिद्धार्थ जैन यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सिद्धार्थ जैन याचे वडील पारसलाल जैन व आई निर्मला जैन यांचाही सन्मान करण्यात आला. महाविद्यालयाची एमएससी झूलॉजीची विद्यार्थिनी मानसी सुहास करंदीकर हिने मुंबई विद्यापिठात सुवर्णपदक पटकावत स्वातंत्र्यवीर सावरकर पारितोषिक पटकावले. डॉ. भावे यांच्या हस्ते तिचा विशेष सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्य माधव बापट यांनी केले. त्यांनी महाविद्यालयाचा गौरवशाली इतिहास सर्वांसमोर मांडताना गेल्या साठ वर्षात महाविद्यालयाने विविध क्षेत्रात मिळवलेले यश, याचीही ओळख करून दिली. सिद्धार्थ जैन याचा परिचय श्रीराम दांडेकर यांनी करून दिला, तर कुलगुरू डॉ. भावे यांचा परिचय योगेश आगवेकर यांनी करून दिला. या वेळी बोलताना सिद्धार्थ जैन याने चार वर्षे मेहनत घेतल्यानंतर मला हे यश मिळाल्याचं सांगितले. शिस्त आणि मेहनत हे आवश्यक गुण असल्यास देशातील सर्वात कठीण असणारी यूपीएससीची परीक्षा क्रॅक करता येते, असेही त्याने सांगितले. या महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेत यश मिळवायचं आहे, त्यांना सर्वतोपरी मार्गदर्शन करायला मी तयार आहे, असेही त्याने सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यापिठाचे गौरव गीत वाजविण्यात आले. यानंतर दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मान्यवरांचे स्वागत प्राचार्य डॉ. बापट, `अरमन मंगेश तांबे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विनायक बांद्रे यांनी केले.

## पनवेल प्रेस क्लब संस्थेच्या अध्यक्षपदी देविदास गायकवाड यांची निवड

**पान १ वरुन** न्याय देण्याचे काम संस्थेने केले आहे. संस्थेने गेली २० वर्ष सामाजिक बांधिलकी जपत पत्रकारांच्या न्याय हक्का बरोबरच सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबवून सामाजिक स्तरावर आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटविला आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय मिळवून देणारी संस्था म्हणून आज पनवेल प्रेस क्लब कडे पाहिले जाते. एक संघर्षशील सामाजिक संघटन म्हणून पनवेल प्रेस क्लब या संस्थेकडे पाहिले जाते . अध्यक्षपदी निवड झालेले देविदास गायकवाड हे गेल्या २५ वर्षापासून पत्रकार क्षेत्रात काम करीत आहे त्यामुळे त्यांना पत्रकारांच्या अनेक प्रश्नांची जाण आहे. प्रशिक एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी रायगड पब्लिक स्कूल उभी करून शैक्षणिक क्षेत्रात देखील भरीव काम केले आहे. कर्मयोगी हे पुस्तक त्यांनी प्रकाशित केले आहे तर गंध मातीचा हे पुस्तक प्रकाशनाच्या वाटेवर आहे. त्यामुळे गायकवाड यांना दांडगा अनुभव असल्याने नवीन अध्यक्ष त्यांच्या पदाला योग्य न्याय देतील असा विश्वास संस्थेच्या कार्यकारिणी सदस्यांनी व्यक्त केला आहे. सर्व पत्रकार सदस्यांना सोबत घेऊन पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी लढा सुरूच राहील परंतु त्यासोबतच समाज आणि पत्रकार यांच्यातील दरी कमी करण्याचा प्रयत्न केला जाईल पत्रकारांच्या कायद्याबाबत जनमानसात प्रबोधन केले जाईल. प्रिंट मीडिया , टीव्ही मीडिया तसेच सध्या डिजिटल मीडियात महत्व वाढत चाललंय त्यामुळे येणाऱ्या काळात या माध्यमांचा महत्व आणि व्याप्ती आणखी वाढणार आहे त्यामुळे पत्रकारांनी सर्व क्षमता आत्मसात करायला हव्यात असे गायकवाड यांनी बोलताना सांगितले.

# पनवेल परिसरातील अनेक रेल्वे स्थानकांत असुविधांमुळे प्रवासी वर्ग त्रस्त

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

पनवेलसह खांदेश्वर, मानसरोवर, खारघर या हार्बर मार्गावरील रेल्वे स्थानकात सध्या भटक्या श्वानांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढल्याचे पाहायला मिळत आहे. टोळक्याने फिरणाऱ्या या श्वानांच्या भीतीने स्थानकात चढणाऱ्या आणि उतरणाऱ्या प्रवाशांना काहीशा भीतीनेच स्थानकात यावे लागत असून स्थानिक प्रशासनाने या श्वानांचा बंदोबस्त करण्याची मागणी प्रवासी करत आहेत. मुंबई, नवी मुंबई आणि ठाण्यात दररोज कामानिमित्त जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. सिडको आणि रेल्वेच्या माध्यमातून विकसित करण्यात लेल्या या स्थानकातुन खारघर, कामोठे, कळंबोली, तळोजा, खांदा वसाहत आणि नवीन पनवेलमध्ये राहणाऱ्यांची मोठी वर्दळ असते. हे स्थानक त्यांना वाहतुकीसाठी सोयीचे असल्याने येथील बहुतांशी प्रवासी याच स्थानकात उतरतात. दररोज सात ते आठ हजार प्रवासी या स्थानकावरून प्रवास करीत असून पाच लाख रुपयांचे उत्पन्न रेल्वेला मिळते. दिवसेंदिवस स्थानकातील प्रवाशांची संख्या वाढत आहे. रेल्वे स्थानकावरून कामोठे वसाहत, नवीन पनवेलकरिताही एनएमएमटीच्या फेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत. या मुळे स्थानकात प्रवाशांची संख्या वाढत असली तरी स्थानकात सुविधांचा अभाव असल्याचे पाहायला मिळते.

**बनावट पावत्यांचा वापर**

खान्देश्वर स्थानकात प्रवेश करण्यासाठी कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमीच्या दिशेने असलेल्या मार्गावर अनधिकृतपणे वाहनतळ चालवले जात आहे. सिडको अथवा इतर कोणत्याही प्रशासनाच्या परवानगीशिवाय सुरू असलेल्या या ठिकाणी वाहन उभी करण्यासाठी बनावट पावत्या वापरून शुल्क वसुली केली जात आहे.

**पार्किंगचा अभाव...**

रेल्वे स्थानक परिसरात प्रधानमंत्री आवास योजनेचे काम सुरू असल्याने येथील काही वाहनतळ बंद करण्यात आले आहेत. या मुळे उपलब्ध असलेले वाहनतळ कमी पडत असून वाहनचालकांना रस्त्यावर जागा मिळेल तिथे वाहन उभी करावी लागत असून 'नो पार्किंग' म्हणून घोषित रस्त्यावर उभ्या करण्यात आलेल्या वाहनावर वाहतूक विभागाचे कर्मचारी कारवाई करत असल्याने वाहन चालकांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. भुयारी मार्गात पावसाळ्यात साठते गुडघाभर पाणी; योग्य उपाययोजनेचा अभाव खान्देश्वर रेल्वे स्थानक समुद्रसपाटीपासून तीन मीटर उंचीवर आहे. असे असतानाही स्थानकात जाण्यासाठी तयार करण्यात आलेल्या भुयारी मार्गात पावसाळ्यात गुडघाभर पाणी साठत असल्याने प्रवाशांना स्थानक गाठण्यासाठी पाय आणि पादत्राणे भिजवूनच जावे लागते. प्रत्येक पावसाळ्यात या समस्येला प्रवाशांना तोंड द्यावे लागत आहे. नियोजनबद्ध शहरांचे शिल्पकार अशी नवी मुंबईची ओळख आहे, मात्र खान्देश्वर रेल्वेस्थानकातून प्रवास केल्यावर सिडको महामंडळाचा हा दावा फोल ठरल्याचे चित्र अनुभवास येते. पाण्याचा निचरा होण्यासाठी योग्य उपाययोजना न करण्यात आल्यानेच प्रवाशांना या समस्येला तोंड द्यावे लागते. सिडको प्रशासन मात्र पाणी तुंबण्याच्या या प्रकारावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात अद्यापही अयशस्वी ठरले आहे.

**फेरीवाल्यांकडून होतोय मीटर रूमचा वापर**

हार्बर मार्गावरील इतर स्थानका प्रमाणेच खान्देश्वर रेल्वे स्थानकातदेखील फेरीवाल्यांचा मुक्त वावर पाहायला मिळतो. गंभीर बाब म्हणजे स्थानकात असलेल्या विजेच्या मीटर रूमचा वापर आपले साहित्य ठेवण्यासाठी फेरीवाले करत असल्याचे पाहायला मिळते

**पाणपोईची सफाई तब्बल तीन वर्षांनी**

स्थानकात पाणी पिण्यासाठी पाणपोईची सुविधा उपलब्ध आहे, मात्र या ठिकाणी पाणी साठवणूक करण्यासाठी वापरात असलेल्या टाक्यांची साफसफाई 2023 साली करण्यात आला असल्याचा उल्लेख करण्यात आलेला असल्याने मागील दोन वर्षांत पाणी साठवणूक करण्यासाठी वापरात असलेल्या टाक्यांची सफाईच करण्यात आलेली नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्याचप्रमाणे मोठ्या परप्रातींय फेरीवाल्यांनी हा रेल्वे परिसर गिळंकृत केला असून त्यांच्या दादागिरीचा त्रास स्थानिकांना होत आहे. तसेच भिकाऱ्यांची वर्दळ या सर्वच स्थानकात मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. तर महिला वर्गांना तृतीयपंथांसह गर्दुल्यांचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. रेल्वे पोलीस आपले कर्तव्य नियमित बजावत असले तरी त्यांची संख्या कमी असल्याने या लोकांचे फावते आहे. तरी याबाबत रेल्वे प्रशासनाने ठोस भूमिका घेवून या सर्व समस्यांचे निराकरण करावे अशी मागणी प्रवाशी वर्गाकडून करण्यात येत आहे.

## स्केट नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये विद्यार्थ्यांनी मिळविले सुयश

### हॉट व्हील स्केटिंग क्लब च्या विद्याथ्र्यांचे सुयश

**युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

रोलर सपोर्ट कोचेस फेडरेशन ऑफ इंडिया द्वारा आयोजित स्केट नेशन नॅशनल चॅम्पियनशिप विरार,मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेत मध्यप्रदेश, छत्तीसगढ, गुजरात, आंध्र, तेलंगणा, कर्नाटक आणि महाराष्ट्र राज्य येथील सुमारे 659 स्पर्धकांनी सहभाग नोंदविला स्पर्धेचे उद्‌घाटन माजी महापौर वसई - विरार महानगर पालिका व अमेय क्लासिक क्लब चे संस्थापक राजीव पाटील यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी सर्व संघटनेचे पदाधिकारी, प्रामुख्याने उपस्थित होते.सदर स्पर्धेत होटव्हील स्केटिंग क्लब च्या खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले. त्यात अनुक्रमे धैर्य शिंदे 2 कास्यपदक, श्रवण यवतकर 2 कास्यपदक, पार्थ द्विवेदी 1 कास्यपदक, कृतिका परदेशी 2 कास्यपदक, माहीम खान 2 कास्यपदक, दक्षनी नायर 2 सुवर्णपदक, पटकावले आहे.

सर्व विद्यार्थ्यांना स्केटिंग प्रशिक्षक शशिकांत मोरे व सौरभ जाधव मार्गदर्शन लाभले आहे.यावेळी प्रा. देविदास शिंदे उपस्थित होते.

सदर विदयार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल सर्व स्तरांवरून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होतं आहे.



यशस्वी विद्यार्थांसमवेत आनंदोत्सव साजरा करताना उपस्थित मान्यवर



# शेतकरी बांधवाना संपूर्ण कर्ज माफी मिळालीच पाहीजे..प्रा.वसंत पुरके

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**
**-जितेंद्र खोडे**

**राळेगाव:-** तालुका काँग्रेस च्या वतीने केंद्रातील व राज्यातील भाजपा सरकारच्या विरोधात शेतकरी, शेतमजूर, घरकुल लाभार्थी, लहान - मोठे व्यापारी, आदिवासी बांधव तसेच सुशिक्षित बेरोजगारांच्या आक्रोशाला वाचा फोडणे करिता तहसील कार्यालयावर भव्य धरणे आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून राज्याचे माजी शिक्षणमंत्री प्रा.वसंत पुरके बोलत होते. विधानसभा निवडणूकीत महायुतीने शेतकऱ्यांना कर्जमाफी चे आश्वासन देऊन मते घेतली होती.ती पुर्ण करण्याची मागणी प्रा.वसंत पुरके यांनी केली. राळेगाव विधानसभा मतदार संघात हुकुमशाही चे राजकारण सुरू असुन काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी कुठल्याही दबावात येऊ नये आम्ही आपल्या सोबत आहो अशी सुचना त्यांनी कार्यकर्त्यांना केली .या आंदोलनाच्या एकुण १७ प्रमुख मागण्याचा समावेश होता त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान करणाऱ्यावर कठोर कारवाई करण्यात यावी.२) शेतकरी बांधवांना संपूर्ण कर्जमाफी देण्यात यावी ३) राळेगाव तालुक्यातील मजुर वर्गाला रोजगार उपलब्ध करून देण्यात यावा ४) शेतकरी बांधवांना सरसकट पिक विमा देण्यात यावा ५) ग्रामीण भागातील घरकुल लाभार्थ्यांना शहरांप्रमाणे प्रती घरकुल रु.२,५०,००० येवढे अनुदान देण्यात यावे.ग्रामिण व शहरी असा भेदभाव




करण्यात येऊ नये.६) घरकुल लाभार्थ्यांचे रखडलेले अनुदान त्वरीत देण्यात यावे.७) अतिक्रमीत घरकुल लाभार्थ्यांना शासनाने राहत्या जागेचा मालकी हक्क पट्टा देऊन घरकुलाचा लाभ देण्यात यावा ८) ज्या घरकुल लाभार्थ्यांकडे स्वतः ची जागा नाही अशा लाभार्थ्यांना शासनाने जागा उपलब्ध करून द्यावी ९) अल्पसंख्याक घरकुल योजने अंतर्गत सर्व अल्पसंख्याक समुदायाला घरकुल योजना त्वरीत मंजुर करण्यात यावी.१०) राळेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना जंगली जनावरांचा अत्यंत त्रास होत आहे.उभ्या पिकाची नासाडी, पाळीव जनावरे मारणे, शेतकरी शेतमजूर यांचेवर हल्ला करणे या सारखे प्रकार नेहमी घडत आहेत.तरी शासनाने यावर कायमस्वरूपी बंदोबस्त करावा.११) शेतकऱ्यांना बियाणे पेरणीसाठी स्वतंत्र देण्यात यावे तसेच शेत पांदण रस्ते त्वरीत सुरु करण्यात यावी.१२) घरकुल लाभार्थ्यांना मोफत रेती उपलब्ध करून देण्यात यावी.१३) शहरासह तालुक्यांमध्ये धडक सिंचन विहीर योजना त्वरीत सुरु करण्यात यावी १४) प्रलंबित कृषी पंपाची विज जोडणी त्वरीत सुरु करण्यात यावी १५) तृतीय व चतुर्थ श्रेणीतील पदभरती वरील बंदी हटवून युवकांना नोकरी देण्यात यावी तसेच शिक्षकांच्या भरत्या त्वरीत करण्यात याव्या १६) राळेगाव नगर पंचायत ची रखडलेली पाणी पुरवठा योजना त्वरीत सुरु करण्यात यावी १७) राज्य शासनामधील काही मंत्री धार्मिक चिथावणी खोर भाषणे करून समाजामध्ये धार्मिक तेढ निर्माण करीत आहे तरी त्यांच्या वर कार्यवाही करुन त्यांना मंत्री मंडळातुन बरखास्त करावे या प्रमुख मागण्याचा समावेश आहे.या धरणे आंदोलनात पहलगाम येथे अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या भारतियांना श्रद्धांजली वाहून आंदोलनाला सुरूवात करण्यात आली. धरणे आंदोलनात भारत जोडोअभियानचे उत्तम खंडारे,राळेगाव तालुका काँग्रेस चे अध्यक्ष राजु तेलंगे, शहराध्यक्ष प्रदीप ठुणे, नगर पंचायत चे नगराध्यक्ष रवि शेराम, नगरसेवक नंदु गांधी, खरेदी विक्री चे अध्यक्ष मिलिंद इंगोले, सोसायटी चे अध्यक्ष सचिन हुरकुंडे, नगरसेवक कमलेश गहलोत, नगरसेवक कुंदन कांबळे, नगरसेवक मधुकर राजुरकर,हमीदभाई पठाण,बंडु लोहकरे, कृषी उत्पन्न बाजार समिती चे संचालक दिपक देशमुख, आनंदराव बोंदरे, रविंद्र खैरकार, उत्तमराव फुटाणे, राजकुमार जवादे , नगरसेवक दिलीप दुधगीकर, रणजित कोरडे,उन्मेष पुरके ,जया रागीनवार, मारोतराव पडाळ,चंदु कानारकर, फिरोज लाखाणी,अफसरभाई, पंकज गावंडे,रवि गलांडे, गजानन ढाले, निलेश रोठे, शशांक केंढे, बाभुळगाव तालुका काँग्रेस चे अध्यक्ष मोहन बनकर, पांडुरंगजी लांडगे, सुनील मते,अमेय घोडे,राजु ओंकार , प्रकाश पोपट,विजय कनाके,नारायण पिसे, सचिन राडे, दिलीप मोहीते,अमृत पाझारे,कृष्णाजी झाडे, अंकुश मुनेश्वर, सदानंद भोरे,बाबा केशववार ,शरद घोसले,थुटुरकर सर, बाबासाहेब दरणे, मंगेश पिंपरे, अशोक उमरतकर,वॅनिश भोसले, किशोर धामंदे,प्रफुल तायवाडे,राजू पत्रे,रामु भोयर,मनोज पवार, भाऊराव कुडमेथे,अल्काताई कुडमथे, पुरुषोत्तम चिडे, राहुल होले,मोहन मडावी,वडते सर,भरत ठुणे, संदीप भारशंकर, धनराज इंगोले,विलास हिवरकर,शुभम सरोदे,ऋषभ कडू, विठ्ठल पंदरे,बाबाराव वरटकर,राजु चिडे,राजु पुडके,अभिलाष उमरे, हेमंत तागडे,संजय पडोळे,आर. जी.खोबरे, छत्रपती ढवळे, राजेश काळे,तातेश्वर पिसे,गजु नाकाडे,विकी इंगळे, सुमित डाखोरे,शंकर सोनतापे, चंद्रकांत कान्हेरकर, अशोक भागवत,मंथन सोनवाणे, गजानन पाल,अंकीत कटारीया,रवि गलांडे,रामधन राठोड, जनार्दन कडू, सदानंद भोरे,राजु पुरके,किरण निमट, दिलीप निमट, नामदेव काकडे, तुळशीराम दारुंडे,मनोज इंगोले, सचिन राडे,सागर वनस्कर,शेख अब्दुल, राहुल बहाळे यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.मा.तहसीलदार, राळेगाव यांना मागण्याचे निवेदन सादर करून धरणे आंदोलनाची सांगता झाली.

## राष्ट्रीय महामार्गावरील अवैध पार्किंग करणाऱ्या 363वाहनांविरोधात

### उरण वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**दैनिक युवक आधार**
**उरण प्रतिनिधी/सायली साळुंके**

सातत्याने वाहनांची वर्दळ असलेल्या उरण परिसरातील विविध राष्ट्रीय महामार्गांवर व गोदाम परिसरातील रस्त्यांवर कोणत्याही प्रकारे अवजड वाहने पार्किंग होणार नाहीत याची वाहनचालकांनी खबरदारी घ्यावी. सर्व वाहने नेमण्यात आलेल्या अधिकृत पार्किंगमध्ये उभी करावीत.महामार्ग अथवा गोदामांच्या रोडवर कोणतेही वाहन उभे करण्यात आलेले निर्दशनास आल्यास त्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. आशाप्रकारच्या गंभीर सूचना उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अतुल दहिफळे वाहनचालकांना दिल्या आहेत.

नवी मुंबईचे वाहतूक पोलिस उपायुक्त तिरुपती काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली व सहाय्यक पोलिस आयुक्त वाहतूक विठ्ठल कुबडे यांच्या निर्देशाने उर ण परिसर व एन एच ४- बी या राष्ट्रीय महामार्गालगत व मुख्य रस्त्यावर पार्क होणाऱ्या अवजड वाहनांवर आळा घालण्यासाठी व त्यातूनच अपघाताचे प्रमाण कमी होण्यासाठी नवीन उपक्रमाद्वारे विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.या दरम्यान सीएफएस व एम टी यार्ड यांच्या बाहेर पार्किंग होणाऱ्या अवजड कंटेनर व मुख्य रस्त्यावर पार्किंग करण्यात येणारी वाहनांवर 9 गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. वाहतुकीस अडथळा करणाऱ्या 363 वाहनांवर कारवाया करण्यात आल्या आहेत. उरण व जेएनपीए परिसरातील विविध पार्किंगमध्ये सुमारे पाच हजार अवजड वाहने उभी करण्याची व्यवस्था आहे.पार्कीगसाठी व्यवस्था असलेल्या ठिकाणीच वाहनचालकांनी अवजड वाहनांची पार्किंग करण्याची आवश्यकता आहे.मात्र काही वाहन चालक पार्किंगची व्यवस्था असतानाही विविध राष्टीय महामार्गावर अवैधरित्या वाहनांची पार्किंग करून वाहतूक कोंडी व अपघाताला कारणीभूत ठरत आहेत. अशा वाहनचालकांनी उरण परिसरातील विविध राष्ट्रीय महामार्ग अथवा गोदामांच्या रोडवर कोणतेही वाहन उभे करण्यात आल्याचे निर्दशनास आल्यास त्यावर कायदेशीर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अतुल दहिफळे वाहनचालकांना दिला आहे



**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## .. महामंडळ स्थापन झाले हे समाजाचे श्रेय समाजाच्या पाठिंबा मुळेच संघर्ष करण्याची प्रेरणा -- दिपक रणनवरे..

**दैनिक युवक आधार -**
**-संतोष पुदाले**

**तुळजापूर (धाराशिव** नळदुर्ग येथे भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळाबाबत सविस्तर मार्गदर्शन कार्यक्रम नळदुर्ग शहरातील मल्लिकार्जुन मंदिर येथे आयोजित केला होता कार्यक्रमाला सुरुवात करण्यापूर्वी काश्मीर ( पहलगाम) येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली भगवान परशुराम हिंदवी स्वराज्याची संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज जगत ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून कार्यक्रमास सुरुवात केली या कार्यक्रमास च्या मुख्य अतिथी म्हणून महामंडळ स्थापन होण्यासाठी अन्नत्याग करणारे उपोषण कार्यकर्ते व पेशवा युवा संघटनेचे संस्थापक श्री .दीपक भाऊ रणनवरे यांचे ऐतिहासिक नळदुर्ग शहरातील किल्ल्याची प्रतिमा भेट देऊन समाजाच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला त्यानंतर कार्यक्रमात समाज बांधवांना श्री.दीपक भाऊंनी महामंडळाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले तसेच समाजातील गरजूंनी लाभ घ्यावा असे आव्हान केले यावेळी तुळजापूर पेशवा युवा संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रमोद कुलकर्णी नळदुर्ग शहर ब्राह्मण समाज संघटनेचे अध्यक्ष विनायक अहंकारी सचिव मुकुंद नाईक यांनी हि आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौरभ रामदासी यांनी केले व आभार मनोज कुलकर्णी यांनी मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अजय अणदुरकर प्रदीप ग्रामोपाध्ये उमेश नाईक अंबुलगे अजय देशपांडे सचिन भुमकर संदीप वैद्य प्रसन्न कुलकर्णी सचिन होर्टीकर नितीन कुलकर्णी राजू वैद्य सनी भुमकर ज्ञानेश्वर केसकर मयूर जोशी सुदर्शन पुराणिक आनंद कमठाणकर संतोष नाईक यांच्यासह ब्राह्मण समाज संघटना पेशवा युवा संघटना परशुराम प्रतिष्ठान मध्व मंडळ उपाध्ये महामंडळाचे सदस्य यांनी प्रयत्न केले यावेळी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते




## विंचूर शहरात 'पहेलगाम' येथील हल्ल्याचा निषेध; विंचूर स्वयंस्फूर्तीने कडकडीत बंद..



**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**विंचूर :-** जम्मु-काश्मीर मधील 'पहेलगाम' येथे २२ एप्रिल, मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. तर पंधराहून अधिक जण जखमी झाले आहेत. अनेक निष्पाप पर्यटकांचे प्राण गेले. या घटनेच्या निषेधार्थ विंचूर शहरांमध्ये आज बंद पाळण्यात आला आणि आंदोलने झाली भारत माता की जय, वंदे मातरम,छत्रपती शिवाजी महाराज की जय,धर्मवीर संभाजी महाराज की जय, पाकिस्तान मुर्दाबाद मुर्दाबाद अशा घोषणा देण्यात आल्या _विंचूर गावातील बहुतांश दुकाने, कार्यालये आणि वाहतूक सेवा बंद ठेवण्यात आल्या. तर अत्यावश्यक सेवा सुरू होत्या गावातील अनेक व्यापाऱ्यांनी आपापली दुकाने स्वयंस्फूर्तपणे बंद ठेवली. शाळा, कॉलेज, बाजारपेठा आणि वाहतूक सेवाही प्रभावित झाली._ _सकाळपासूनच विंचूर मध्ये अनेक दुकाने, बाजारपेठा आणि वाहतूक सेवा बंद ठेवण्यात आली आहेत. पोलीस आणि प्रशासनाकडून बंद दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा भंग होऊ नये म्हणून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. विंचूर मधील नागरिकांनी या कठीण प्रसंगी एकजुटीने प्रतिक्रिया दिली असून, दहशतवादाविरोधात ठाम भूमिका घेतली आहे. _केंद्र सरकारने कठोर पावले उचलून अतिरेक्यांना कंठस्नान घालावे हा दहशतवादी हल्ला घडवून आणणाऱ्या संघटनांच्या अतिरेक्यांना कठोरातील -कठोर शासन करावे. यावेळी विंचूर , विष्णुनगर, हनुमाननगर, कृष्णवाडी, सुभाषनगर , विठ्ठलवाडी या ग्रामस्थांनी मागणी केली आहे._

## दिव्यात चिकन विक्रेत्यावर पाच जणांनी केले सपासप वार.

### सदर चिकन विक्रेता गंभीर जखमी...

दैनिक युवक आधार
अमित जाधव -वार्ताहर

ठाणे, दिवा ता २७ एप्रिल : दिव्यात ऐका मच्छी/मटण विक्रेत्यावर पाच जणांचा जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली आहे. नूरइस्लाम अंगूर शेख (वय 32 वर्षे) व्यवसाय-चिकन मच्छी विक्री, राहणार बेडेकर नगर, दिवा पुर्व असून त्याचे अमिन चिकन शॉप या दुकानासाठी लागणारे मासे आरोपी रोहित गुप्ता याचेकडून खरेदी करत नसल्याचा राग मनात धरून यातील आरोपींनी फिर्यादी नूरइस्लाम अंगूर शेख यास जीवे ठार मारण्याच्या सामाइक उद्देशाने फिर्यादीचे दोन्ही हातावर, डाव्या खांद्यावर, छातीवर आणि डाव्या पायावर कोयत्याने व चाकूने वार केले असून गंभीर जखमी केले आहे. फिर्यादी नूरइस्लाम अंगूर शेख यावर मुंबईतील सायन रुग्णालयात उपचार सुरु आहे. प्रकरणी दिवा पोलिसांनी सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी रोहित गुप्ता यास अटक करण्यात आली असून प्रकरणी रोहित गुप्ता, कल्पेश भंडारी आणी इतर तीन अनोळखी इसम यांच्यावर मुंब्रा पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्र - 676/2025 भारतीय न्याय संहिता कलम 109,189(1), 189(2), 189(4), 190, 191(2), 191(3) सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 37(3)135 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन्हीही आरोपीना आज कोर्टात हजर केले असता पुढील चौकशीसाठी पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. सदर प्रकरणाचा तपास मुंब्रा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दिवा पोलीस चौकीचे सहायक पोलीस निरीक्षक अमोल कोळेकर करत आहेत



### विठ्ठलाचा अभंग

संताचिया बोल ।
विठ्ठलाचा ध्यास ॥
तुझाच उपास ।
विठूराया ॥१ ॥

भक्तीचाच ठेवा ।
सोडूनिया माया ॥
मातीचीच काया ।
होऊ दास ॥२ ॥

परमार्थी देह ।
चित्तीला विचार ॥
एक तो आचार ।
मनोभावे ॥३ ॥

देहाची ती चक्री ।
जन्म-मरणाची ॥
विठू स्मरणाची ।
हरीकथा ॥४ ॥

संतांचीच वाट ।
विठू नाम घ्यावे ॥
काळ निघो जावे ।
चित्त साव ॥५ ॥

नामाचा गजर ।
उगम प्राणांतुनी ॥
रंग पाण्यातूनी ।
पांडुरंगा ॥६ ॥

काया हेचि माती ।
मन हेचि दासी ॥
रोज आहे काशी ।
तुजसंगे ॥७ ॥

पायरीचा धुळा ।
मस्तकी वाहावा ॥
देह विठू व्हावा ।
मोक्ष देई ॥८ ॥

**प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर**
**( रमाईसुत ).**
**छत्रपती संभाजीनगर**






## भरदिवसा दुचाकीस्वार पाडून पाच लाखांची लूट देवठाणा-कानडी रस्त्यावर धक्कादायक प्रकार; पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

**दैनिक युवक आधार**
**तळणी वार्ताहर**

उस्वद येथील विष्णु सुंदरराव लोमटे (वय ३०) यांच्यावर देवठाणा-कानडी रस्त्यावर भरदिवसा लुटीचा प्रकार घडला. रविवारी (ता. २७) दुपारी १:४५ वाजता, देवठाणा कानडी रस्त्यावरील पुलाजवळ पाठीमागून आलेल्या अज्ञातांनी त्यांच्या दुचाकीला धक्का दिला. या अपघातात लोमटे रस्त्यावर पडून गंभीर जखमी झाले व काही वेळ बेशुद्ध अवस्थेत पडून राहिले. शुद्धीवर आल्यानंतर त्यांना लक्षात आले की, त्यांच्या जवळील पाच लाख रुपयांची रोकड लंपास करण्यात आली आहे. घटनेनंतर त्यांनी वडील सुंदरराव लोमटे यांना फोन करून माहिती दिली. यानंतर कानडी येथील नातेवाईक सुनिल खंदारे यांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना प्रथम तळणी व नंतर जालन्याच्या खाजगी रुग्णालयात उपचारासाठी हलवले. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. तळणी सह परिसरात मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उत्खनन व वाहतूक सुरू असतानाही भरदिवसा लूट होणे, यामुळे मंठा पोलिसांच्या कार्यक्षमतेवर तीव्र सवाल निर्माण झाले आहेत. स्थानिक नागरिकांनी या घटनेची गंभीर दखल घेण्याची मागणी केली आहे.

## "पहलगम दहशतवादी हल्ल्याचा भाजपा अनुजाती मोर्चा व सर्व शक्ती सेनेचा तीव्र निषेध"

**दैनिक युवक आधार**
**किशोर गुडेकर**
**मुबंई प्रतिनिधी प्रमुख**

22 एप्रिल 2025 रोजी पहलगाम ( जम्मु काश्मीर ) येथे दहशदवादी अतिरेकी यांनी केलेल्या अंधाधुंद बेशुड गोळीबाराचा भ्याड हल्याचा भाजप व सर्व शक्ती सेना महाराष्ट्र राज्याच्या वतीने तीव्र जाहीर निषेध करीत असुन असे कृत्य करणाऱ्या माथेफिरू विध्यनसंतोषी माथेफिरू नराधमाला त्वरित अटक करून फाशीची शिक्षा ध्यावी. भ्याड हल्यात गोळीबारात महाराष्ट्र राज्यातील मृत पावलेले हेमंत जोशी (डोंबिवली) अतुल मोने (डोंबिवली) संजय लेले ( डोंबिवली ) दिलीप देसले (पनवेल) कौस्तुभ गंणबोटे (पुणे) संतोष जगदाळे (पुणे) व इतर राज्यातील मृत पावलेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना केंद्र सरकारने प्रत्येकी 5 कोटी रुपये मदत द्यावी. तर जखमी झालेल्या व्यक्तींना केंद्राने 1,कोटी रुपये मदत द्यावी. तर या भ्याड हल्यात आपले कर्तव्य बजावत असलेले शहीद झालेले नौदल अधिकारी विनय नरवाल यांना केंद्राने 50 कोटी रुपयाची मदत देऊन त्यांच्या वारसाला किंवा पत्नीला नौदलत अधिकारी या पदावर त्वरित नोकरी ध्यावी. अशी मागणी अँटी करप्शन मानव अधिकार सर्व शक्ती सेना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष तथा भाजप अनुजाती मोर्चा राज्य सचिव प्रा. संजय मोरे सर्व शक्ती सेना राज्य उपाध्यक्ष मायाताई मोरे सर्व शक्ती सेना जिल्हाध्यक्ष डॉ. संदीप गाढे सर्व शक्ती सेना युवक जिल्हाध्यक्ष मयुर कोळी प्रा. अनिल सपकाळे आक्रमक संघटना जिल्हाध्यक्ष मंदाताई सोनवणे प्रा. सुभाष सपकाळे पढरीनाथ कोळी विजय तायडे धनराज कोळी गजानन काडेले भाजप महिला आघाडी शोभाताई कोळी प्रा. स्नेहा सोनवणे मानव अधिकार जिल्हा उपाध्यक्ष संजय अभिमान कोळी प्रभाकर तायडे विजया कोळी ईत्यादीनी पंतप्रधान नरेंद्र मोदी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंग महोदय राज्यपाल साहेब मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे जिल्हा पालकमंत्री गुलाबराव पाटील जलसंपदा मंत्री गिरीष भाऊ महाजन जिल्हाधिकारी आयुष्य प्रसाद साहेब यांच्या कडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे. माहिती प्रा. संजय मोरे.यांनी माहिती दिली





## संघर्षातून सावरलेला एक अवलिया माणूस

**दैनिक. युवक आधार**
**प्रतिनिधी राम ढाकणे**
**उरण रायगड.**

आमचा वर्गमित्र आणि माझा अगदी जवळचा सखा संतोष घोडेराव अतिशय संघर्षातून हा मित्र आपल्या पायावर उभा राहिला. परिस्थितीने अनेक वेळा हरवण्याचे प्रयत्न केले परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदेशाप्रमाणे,जर तुमच्याकडे दोन रुपये असतील तर एक रुपयाची भाकरी आणि एक रुपयाचं पुस्तक घ्या. कारण "भाकरी तुम्हांला जगण्यास मदत करेल आणि पुस्तक तुम्हांला कस जगायचं हे शिकवेल". याप्रमाणे तो शिक्षण घेतच राहिला आणि जिद्द, चिकाटी, प्रयत्न करत यातून यशाच्या शिखरावर तो पोहोचला. आणि आपल्या घरामध्ये असलेलं पिढ्यान पिढ्याचं अठरा विश्व दारिद्र्य दूर करण्यास हातभार लावला. आई-वडिलांनी अतिशय काबाड कष्ट करत संतोष व त्याचे दोन भावंडे यांना लहानचे मोठे केले शिकवलं आणि आपला आशीर्वाद त्यांच्या पाठीशी ठेवला. अतिशय हाल-अपेष्टा सहन करत आपल्या लहान भावाला देखील संतोषने आधार देत स्वतःच्या पायावर उभा केले. सुरुवातीला अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील राजुर या गावी त्याने शिपाई म्हणून नोकरी जॉईन केली त्यामुळे नेहमी असलेली आर्थिक चनचन दूर झाली. पण हा संघर्ष पुरुष तेवढ्यावर समाधान न मानता त्याने आपला अभ्यास सुरूच ठेवला आणि जवळपास तीन वर्षानंतर तो तलाठी म्हणून नाशिक जिल्ह्यामध्ये सटाणा तहसील अंतर्गत रूजू झाला. अशातच कुटुंबाची जबाबदारी सांभाळत आपलं नोकरीचं काम करत



असताना दोन वर्षांपूर्वी त्याला नियतीने एका शारीरिक दुःखाला, एका मोठ्या आजाराला सामोर जावं लागल... परंतु लहानपणापासून ज्यांच्या वाट्याला संघर्ष आला.. संघर्ष करत करत मोठा झालेला माणूस असल्या दुःखाला काय घाबरनार... प्रचंड इच्छाशक्ती असलेला हा अवलिया या मोठ्या दुःखातून सावरला, आणि पुन्हा एकदा आपल्या कर्तव्यावर हजर झाला. आणि काल परवा झालेल्या पदोन्नतीने त्याची मंडळ अधिकारी या पदी निवड झाली हे ऐकून मनाला अतिशय आनंद झाला आपला माणूस कुठेतरी यशाची शिखर सर करत आहे याचा समाधान वाटलं. मित्रा तू भविष्यात अतिशय उच्च पदावर मार्गक्रमण करावे हीच याप्रसंगी सदिच्छा शुभेच्छा देत वर्ग मित्र तसेच एक शिक्षक ज्ञानेश्वर कचरे यांनी आपले मनोगत वेक्त केले. संतोष घोडेराव या संघर्ष पुरुषाला पुन्हा एकदा पुढील वाटचालीस मनापासून खूप खूप शुभेच्छा.

## पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांच्या पाठपुराव्यामुळे 1997 सालातील जप्त असलेला मुद्देमाल करण्यात आला परत

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांनी पदभार स्वीकारल्यापासून विविध गुन्ह्यांची उकल केल्यामुळे अनेक गाव गुंडांना त्यांची धडकी बसली असतानाच नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलींद भारांबे यांच्या आदेशानुसार मुद्देमाल निर्गती मोहिमेंतर्गत त्यांनी 1997 साली गुन्ह्यामध्ये जप्त करण्यात आलेले 17.50 तोळे वजनाचे दागिने सदर व्यक्तीला मुंबई येथून शोधून काढून परत केल्याने त्यांचे कौतुक होत आहे. तसेच परिमंडळ 2 मधील हा महत्वाचा असा एकमेव गुन्हा असेल जो फक्त वपोनि यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नाने निकाली निघाला आहे. पनवेल शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर 518/1997 भादवि कलम 420,467,468,470 मधील आरोपी धीरज विनोदकुमार शहा व विनोदकुमार जीव लाल शहा यांचेकडून घर झडती



पंचनाम्यामध्ये दागिने जप्त केले होते. सदरचा मुद्देमाल परत मिळवणेसाठी धीरज विनोदकुमार शहा यांनी मा. न्यायालयात अर्ज केला होता परंतु कालांतराने ते मयत झाल्याने त्याची आई यांनी मा. न्यायालयात अर्ज केला परंतु आई देखील मयत झाल्याने विनोदकुमार जीव लाल शहा यांनी अर्ज केला परंतु सदर मुद्देमाल परत मिळणे बाबत काही आदेश होत नसल्याने त्यांनी त्या गोष्टीकडे दुर्लक्ष केले होते. परंतु सदर मुद्देमाल परत करणे बाबत 2017 मधे आदेश झाले होते परंतु त्याबाबत त्यांना काही माहीत नव्हते. दरम्यान सह.पोलीस आयुक्त संजय ऐनुपरे, परिमंडळ 2 चे पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते, सहा. पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी बऱ्याच कालावधी पासून पोलीस स्टेशन येथे शिल्लक असलेल्या मुद्देलाल निर्गती करिता मोहीम काढली असता त्यांना सदर मुद्देमाल आढळून आल्याने त्यांच्या मार्गदर्शनाखाली मुद्देमाल कारकून म.पो.हवा.ज्योती दुधाने व मपोकॉ. सुशिला सवार यांनी सुद्धा मेहनत घेतली. अखेरीस विनोदकुमार जीव लाल शहा यांचा मुंबई येथील पत्त्याचा शोध घेऊन त्यांचे पोलीस ठाणे येथे जप्त असलेले 17.50 तोळे वजनाचे सोने मूळ मालक विनोद कुमार जिव लाल शहा रा मुंबई 14 दादर यांचे कडून मा.न्यायालयाची कायदेशीर कारवाई पूर्ण करून घेऊन वपोनि नितीन ठाकरे यांनी त्यांच्या ताब्यात दिले असता आपल्या वाडवडिलांचे खुप जुने असे पिढीजात दागिने फक्त वपोनि यांनी पाठपुरावा केल्याने परत मिळाले असल्याचे आनंदाश्रू विनोदकुमार जीवलाल शहा यांच्या डोळ्यातून उभे राहिले होते. त्याबद्दल त्यांनी पोलिसांचे मनापासून आभार मानले आहेत.

## जावळे बिल्डिंगमध्ये वायर स्पार्किंगची घटना फायर ब्रिगेडच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला

**दैनिक युवक आधार**
**मुबंई विभाग प्रतिनिधी प्रमुख**
**: किशोर रमाकांत गुडेकर**

मुंबई (दादर ) २६ एप्रिल संध्याकाळच्या सुमारास जावळे बिल्डिंगमधील मीटर रूममध्ये वायरिंगमध्ये स्पार्क होत असल्याची घटना घडली. मीटर रूममधून दुर्गंधी येत असल्याचे लक्षात येताच प्रवीण नरे, मयूर धुरी आणि ॲड. योगिता सावंत यांनी तत्काळ फायर ब्रिगेडला कॉल करून पाचारण केले. त्यांच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली. रहिवाशांच्या मदतीने आणि फायर ब्रिगेडच्या वेळीच हस्तक्षेपाने आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. फायर ब्रिगेडच्या जलद प्रतिसादामुळे परिसरातील नागरिकांचा जीवित व मालमत्तेचा मोठा धोका टळला. दरम्यान, बेस्ट विभागाला देखील घटनेची माहिती देण्यात आली होती. मात्र, त्यांच्या प्रतिसादात झालेल्या दिरंगाईमुळे नागरिकांमध्ये नाराजीचा सूर व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, गेली चार वर्षे रहिवासी ओव्हरहेड वायर जमिनीखाली नेण्याची मागणी सातत्याने करीत आहेत. परंतु अद्याप या मागणीवर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.

रहिवाशांनी बेस्ट प्रशासनाकडून त्वरीत योग्य पावले उचलण्याची मागणी केली असून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे.












## नवी मुंबई येथे वुमेन्स प्रीमियम लीग क्रिकेट टुर्नामेंट मध्ये ईपीआरचा सहभाग

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

नवी मुंबई वुमेन्स क्रिकेट टुर्नामेंट नुकताच साजरा करण्यात आला. अविस्मरणीय असा हा सोहळा पार पडला. ज्यात अनेक दिग्गज आले होते. राजकीय क्षेत्रामधील विद्यमान केंद्रीय न्याय मंत्री रामदास आठवले यांनी या प्रसंगी स्वतः उपस्थीती नोंदवली. आणि उद्घाटन केले. त्यांनी आपल्या मिश्किल बोली भाषेने मनोगत व्यक्त केले आणि स्त्री शक्ती बाबत वक्तव्य केले.

त्याचं बरोबरीने अपर्णा शहा संस्थापित अभियान ईपीआर टीम अपर्णा मॅडम यांस देखील विशेष अतिथी म्हणून निमंत्रण होते , त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत राजदूतानी हजेरी लावली आणि हा जनजागृतीचा संदेश पोहचवला. ज्या प्रकारे आज आपण एक दिवस हा खेळण्याचा आनंद घेत आहोत, हा आनंद आपन चिरंतर टिकवू शकतो हे ईपीआर च्या माध्यमातुन लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी टीम यशस्वी ठरली, त्याचं प्रमाणे सर्व शारीरिक आणि मानसिक रित्या अजून प्रगल्भ विचार आचार करणे अत्यंत गरजेचे आहे , खाणे , खेळणे, वाचणे हे जीवनात किती महत्वाचे आहे हे उपस्थित जनसमुदायास, आणि प्राप्त स्थळी उपस्थित प्रेक्षक या मध्ये हा जनजागृतीचा आवाज पोहोचवण्यास ईपीआर टीमला यश आले.



## खांदेश्वर येथे कोयत्याने वार करून ठार मारण्याचा केला प्रयत्न

**दैनिक युवक आधार**
पनवेल, (वार्ताहर)

पत्नी आणि अन्य एका तरुणीवर कोयत्याने वार करून त्यांना ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी आरोपी हरी चव्हाण (वय 37 राहणार ओम साई बिल्डिंग, देवदगाव) यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी हरी चव्हाण याने त्याचे पत्नीचे अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून पत्नीच्या डोक्यात कोयत्याने वार करून तिला गंभीर जखमी केले आणि त्यानंतर एका तरुणीच्या घरी जाऊन तिच्या डोक्यात आणि हातावर कोयत्याने वार केले. यात ती तरुणी देखील गंभीर जखमी झाली. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## भाजप संघटन पर्व अंतर्गत मराठवाडा विभागीय बैठक हिंगोलीत उत्साहात संपन्न!

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड** : भारतीय जनता पार्टी हा संघटनेच्या बळावर यश मिळवणारा पक्ष आहे. संघटन पर्व 2025 अंतर्गत नांदेड, हिंगोली, लातूर व परभणी जिल्ह्यांची विभागीय आढावा बैठक आज हिंगोली येथे मोठ्या उत्साहात पार पडली. भाजपाचे कार्यकारी अध्यक्ष मा. रवींद्र चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. पक्षाची ध्येयधोरणे, विकासकामे आणि राष्ट्रहिताचा दृष्टिकोन जनतेपर्यंत पोहोचवण्याचा निर्धार बैठकीत सर्वांनी व्यक्त केला. या प्रसंगी उपस्थित राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर, भाजपा मराठवाडा विभागीय संघटन मंत्री संजयजी कौडगे, खा. अजितजी गोपछडे, आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, आ. तानाजीराव मुटकुळे, भाजपचे जिल्हाध्यक्ष मा. संतुकरावजी हंबर्डे, नांदेड भाजपा महानगर अध्यक्ष मा.आ. अमरभाऊ राजूरकर, नांदेड दक्षिण भाजपच्या महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा सौ. पुनम पवार यांच्यासह भाजपचे सर्व माजी खासदार, माजी आमदार नांदेड, हिंगोली, परभणी आणि लातूरचे भाजपचे जिल्हाध्यक्ष, विविध आघाड्यांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## मानसिक रुग्ण महिला बेपत्ता

दैनिक युवक आधार
पनवेल, (वार्ताहर)



मानसिक रुग्ण महिला ही पनवेल रेल्वे स्टेशन परिसरातून बेपत्ता झाल्याची घटना घडली असून तिचा शोध पनवेल रेल्वे पोलीस करीत आहेत.

एरेडला नागमणी (60 रा.डेरवली) असे या महिलेचे नाव असून उंची 5 फुट 5 इंच, अंगाने सडपातळ, रंगाने गहुवर्णीय, चेहरा उभट, नाक सरळ, केस काळे वाढलेले आहेत. तिच्या अंगात भगवी साडी व पिवळ्या रंगाचा ब्लाऊज आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी हरवलेले महिला व बालके विषयी पनवेल रेल्वे पोलिसांनी प्रभावीपणे राबविलेल्या शोध मोहिमेंतर्गत वपोनि संजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय यादव, म.पो.हवा.बोराटे मो.नं.9821425404 व पो.शि.आर.एस.मुंडे मो.नं.9075311390 येथे संपर्क साधावा.

# पनवेलच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट प्रशिक्षण केंद्रातून क्रिकेटचे रत्न मिळतील – माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार







**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

क्रिकेटची पंढरी म्हणून ओळख असलेल्या लॉर्ड मैदानावर दिलीप वेंगसरकर यांनी धावांचे तीनदा शतक झळकवले आहे आणि अशा रत्नपारखी व्यक्तिमत्वाकडून पनवेलच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट प्रशिक्षण केंद्रातून क्रिकेटचे रत्न मिळतील, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार यांनी आज नवीन पनवेल येथे केले. कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या संकल्पनेतून व पाठपुराव्यातून तसेच तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख, आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रशासकीय अनुभवातून पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून नवीन पनवेल येथे साकारलेल्या दिलीप वेंगसरकर संचलित आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन नामदार आशिष शेलार यांच्या हस्ते झाले. या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधांनी सुसज्ज असलेल्या या केंद्रामुळे पनवेल आणि परिसरातील नवोदित क्रिकेटपटूंना दर्जेदार प्रशिक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. क्रिकेट क्षेत्रात नवीन प्रतिभावान खेळाडू घडवण्यासाठी हे केंद्र उपयुक्त ठरणार असून या केंद्राचे उद्घाटक म्हणून नामदार आशिष शेलार बोलत होते. तत्पूर्वी काश्मीरमधील पहलगाम येथे निष्पाप पर्यटकांवर झालेल्या अमानुष दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. नामदार आशिष शेलार यांनी पुढे बोलताना सांगितले कि, क्रीडा क्षेत्राच्या अनुषंगाने उभारण्यात आलेल्या या दर्जेदार प्रशिक्षण केंद्राची सुविधा एक नंबरची आहे. विमानतळ आणि क्रिकेट प्रशिक्षण केंद्र यांच्यात चार किलोमीटर अंतर आहे त्यामुळे कनेक्ट फ्लाईटच्या निमित्ताने या ठिकाणी आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू सरावासाठी येतील. अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त करतानाच हे प्रशिक्षण केंद्र उत्तम आहेतच त्यामुळे येथील वाढती सुविधा लक्षात घेऊन रोहित शर्मा सुद्धा सरावाला येईल असा विश्वासही व्यक्त केला. टेक्निक, टेक्नॉलॉजी, एकाग्रता आणि सातत्य टिकवणे महत्वाचे असते आणि ते या ठिकाणी होईल असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. मी बीसीसीआय, एमसीएमध्ये काम केले आहे. एशियन क्रिकेट कौन्सिलमध्ये काम करत आहे, त्यामुळे क्रिकेट व आपले नाते अतूट असल्याचे अधोरेखित करत आजच्या या प्रशिक्षण केंद्राचे उदघाट्न होत असताना हि सुविधा खेळाडू आणि क्रिकेटप्रेमींसाठी उपलब्ध झाली आहे त्याचा खूप आनंद होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना खासदार श्रीरंग बारणे यांनी आपल्या भाषणात सांगितले कि, लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून पनवेलमध्ये मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या रूपाने जनमाणसाला आवश्यक असलेला लोकप्रतिनिधी पुन्हा मिळाला आहे. राजकारणात दुसरी टर्म मिळाल्यावर डोक्यात बडेजावची हवा जाते पण आमदार प्रशांत ठाकूर चार वेळा आमदार होऊनही त्यांच्या डोक्यात कधीच मोठेपणाची हवा गेली नाही. तेव्हा पण आणि आजपण त्यांच्या स्वभावात कुठलाच बदल झाला नाही, असेही त्यांनी नमूद केले. दिलीप वेंगसरकर स्वतः मेहनत घेतात खेळाडूंचे मनोधैर्य वाढवतात. पुण्यामध्ये दिलीप वेंगसरकर यांच्या माध्यमातून अकादमी उभारली गेली आणि त्यातून गरीब कुटुंबातून ऋतुराज गायकवाड देशासाठी खेळत आहे, त्या अनुषंगाने या अकादमीतून चांगले खेळाडू घडतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात सांगितले कि, पनवेल महानगरपालिकेची २०१६ साली स्थापना झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ४५ डेज टार्गेट संकल्पना आखली आणि यामध्येही महानगरपालिका यशस्वी ठरली. अल्पावधीतच स्वच्छता पुरस्कार, विविध विकासकामे, नागरिकांशी कनेक्ट, नाविन्यपूर्ण संकल्पना व उपक्रमे राबवत पनवेल महापालिकेने राज्यात व देशात आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. कुस्ती, कबड्डी, क्रिकेट अशा खेळांचे संकुल उभे राहत असतानाच नागरिकांच्या आरोग्यासाठी आरोग्य केंद्रांची साखळी निर्माण झाली आहे असे सांगतानाच या आंतरराष्ट्रीय क्रिकेट प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून महत्त्वाकांक्षी आणि अत्याधुनिक सुविधा उपलब्ध झाली आहे, असेही त्यांनी नमूद केले. त्यांनी पुढे बोलताना गावांसाठी मैदाने उपलब्ध झाली पाहिजेत यासाठी आपल्या भाषणातून या विषयावर लक्ष वेधले. ९५ गावांची जागा गावठाण सोडून बाकी जागा सिडको संपादित आहे.नागरी सुविधा कामे तसेच प्रत्येक मैदान मिळाले पाहिजे ही माझी आमदार महेश बालदी यांची मागणी राहिली आहे. त्यामुळे प्रत्येक गावाला सामाजिक कार्यासाठी व खेळांसाठी मैदान सिडकोच्या माध्यमातून मिळाले पाहिजे अशी आग्रही पुनर्मागणी यावेळी बोलताना त्यांनी आपल्या भाषणातून केली. वेंगसरकर अकादमीत अनेक प्रतिभावंत खेळाडू निर्माण झाले आहेत त्याचप्रमाणे पनवेल केंद्रातूनही दर्जेदार खेळाडू तयार होतील असे सांगताना नामदार आशिष शेलार आणि क्रिकेट यांचे अतूट नाते आहे, त्यामुळे या प्रशिक्षण केंद्रावरही त्यांचे कायम प्रेम राहणार असल्याचेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणातून अधोरेखित केले. यावेळी बोलताना भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार कर्नल दिलीप वेंगसरकर यांनी सांगितले कि, या ठिकाणहून जाताना या मैदानात वीटभट्टी, रिक्षा ट्रक पार्किंग दिसायची. आमदार प्रशांत ठाकूर, परेश ठाकूर, गणेश देशमुख यांना भेटलो आणि या ठिकाणी प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा विषय मांडला त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. पनवेल परिसरात क्रिकेट विषयी खूप प्रतिभा आहे मात्र टेनिस क्रिकेटवर जोर आहे. तो दूर करून लेदर क्रिकेटवर भर देण्यासाठी आणि येथून प्रतिभावंत खेळाडू निर्माण करण्यासाठी हि अकादमी काम करणार आहे. गावस्कर नंतर सचिन नंतर विराट आणि पुढचा कोण तर तो पनवेलमधून खेळाडू असेल असा विश्वास त्यांनी व्यक्त करत युवा खेळाडूंमध्ये स्फूर्ती निर्माण केली. या ठिकाणी अनेक टूर्नामेंट सुद्धा होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच स्थानिक प्रशिक्षक घेणार असल्याचे सांगत वानखेडे स्टेडियम ज्यांनी तयार केले त्या ठेकेदाराकडून हे काम पूर्ण करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच १ मे पासून या ठिकाणी प्रशिक्षण सुरु होणार असून दोन ते अडीच हजार युवा खेळाडू येतील आणि त्यामधून ८० ते १०० खेळाडू निवडले जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख यांनी सांगितले कि, हि अकादमी पांढरा हत्ती ठरेल अशी शंका निर्माण होत होती पण ती दूर झाली आहे. नुसते रस्ते, गटारे बांधून विकास होत नाही तर शिक्षण, क्रीडा, सांस्कृतिक, कला हे पण तितकेच महत्वाचे आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मागणीवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून सिडको कडून हा भूखंड सिडकोकडून हस्तांतरित करण्यात आले आणि या ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण अकादमी उभी राहून पनवेलच्या नावलौकिकात भर टाकणारा केंद्र साकारले गेले आहे. यावेळी पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी म्हंटले कि, तरुण पिढीमध्ये नवभारत घडवण्याची ऊर्जा आहे. योग्य ऊर्जा जर्मनी जपान सारखी देश निर्माण करते पण अयोग्य ऊर्जा तालिबान सारखी देश घडवते त्यामुळे योग्य ऊर्जेतून भविष्य निर्माण होते. सकारात्मक ऊर्जा घेत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून हे आतंरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र साकारले आहे. त्याचप्रमाणे पनवेल महानगरपालिका हद्दीतील विविध विभागात टेनिस कोर्ट, कबड्डी, कुस्ती, क्रिकेट व इतर खेळांचे क्रीडांगण उभारण्याच्या दृष्टिकोनातून पावले उचलली जात आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नामदार आशिष शेलार यांचे मार्गदर्शन वेळोवेळी मिळत असते त्यामुळे विकासकामांसोबतच क्रीडा संस्कृती चांगल्या पद्धतीने जपण्यात येत आहे. आमदार प्रशांत ठाकूर पनवेलच्या विकासासाठी नेहमी दक्ष असतात तर मंगेश चितळे, गणेश देशमुख यांच्या सारखे चांगले आयुक्त लाभले म्हणून विकास झपाट्याने झाले असल्याचे परेश ठाकूर यांनी सांगितले.

प्रास्ताविकात आयुक्त व प्रशासक मंगेश चितळे यांनी सांगितले कि, आमदार प्रशांत ठाकूर व परेश ठाकूर यांच्या संकल्पनेतून हे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण केंद्र साकारले आहे. साडेसात एकरमध्ये हे केंद्र असून यासाठी १४ कोटी ५५ लाख रुपये खर्च झाला आहे. १५० मीटर व्यासाचे क्रिकेट मैदान, पॅव्हेलियन इमारत, तसेच इतर आवश्यक सुविधा या ठिकाणी आहेत. प्रत्येक वर्षी १० ते १९ वयोगटातील १०१ विद्यार्थ्यांना विनामुल्य प्रशिक्षण देण्यात येणार असून पनवेल महानगरपालिका हद्दीतील ५० टक्के, उर्वरित जिल्ह्यासाठी २५ तर जिल्ह्याबाहेरील २५ टक्के असा कोटा प्रशिक्षणात असणार आहे. तसेच या केंद्राचे मेंटेनन्स वेंगसरकर फाऊंडेशनच्या सीएसआर मधून होणार असल्याचे त्यांनी सांगितले. या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, रायगड जिल्हा क्रिकेटचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी महापौर कविता चौतमोल, सौ. वेंगसरकर, भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, शिवसेनेचे उपनेते बबन पाटील, जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ऍड. प्रकाश बिनेदार, उपाध्यक्ष जयंत पगडे, शिवसेनेचे प्रथमेश सोमण, अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये, उपायुक्त कैलास गावडे, माजी उपमहापौर चारुशीला घरत, सीता पाटील, जगदीश गायकवाड, माजी नगरसेवक अनिल भगत, ऍड. मनोज भुजबळ, विकास घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुशीला घरत, रुचिता लोंढे, वर्षा नाईक, वृषाली वाघमारे, भाजपचे नवीन पनवेल मंडल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, तळोजा मंडल अध्यक्ष दिनेश खानावकर, नेरे मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, आरपीआयचे शहर अध्यक्ष प्रभाकर कांबळे, मुख्य अभियंता संजय कटेकर यांच्यासह खेळाडू आणि क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात प्रशिक्षक, ज्येष्ठ खेळाडू, प्रतिभावंत ज्युनिअर खेळाडू यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## 50 हजारांची मागणी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

किराणा दुकानाचे फोटो आणि शूटिंग करताना याबाबत विचारणा केली असता तुमच्या विरोधात छेडछाडीची तक्रार करते असे बोलून ५० हजारांची मागणी केल्याप्रकरणी तिघां विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

गिरीश वळसे यांचा पनवेल महानगरपालिका मैदानाजवळ किराणा स्टोअर्स आहे ते आणि काका दुकानात असताना इनोव्हा कार क्रमांक एम एच ०२ सीव्ही 7840 मधून रिता यादव (रा.कल्याण पूर्व), ममता यादव (उल्हासनगर), रवी पवार हे उतरले. आणि दुकानात येऊन दुकानाचे फोटो आणि शूटिंग करू लागले. काकांनी त्यांना विचारणा केली असता त्यांनी थांबा, तुम्हाला कोण आहे दाखवते असे बोलून त्यांच्या अंगावर येऊन शिवीगाळ केली. यावेळी ममता यादव ही दुकानाच्या ड्रॉवरमधून पैसे काढण्यास गेली असता वळसे त्यांना अडवण्यासाठी गेला. तेव्हा तुम्ही गुटखा विकता तुमचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल करून तुमच्यावर छेडछाडीचा गुन्हा दाखल करतो असे बोलली. त्यानंतर रवी पवार याने आम्ही पत्रकार असून आमची ताकद दाखवतो असे बोलून शिवीगाळ करून मारहाण केली. त्यानंतर काका धीरज यांनी त्यांना तुमचे ओळखपत्र दाखवा आणि पोलीस ठाण्यात चला असे बोलले असता ममता यादव यांनी आरडाओरडा करून तुमच्या विरोधात छेडछाडीची तक्रार दाखल करते असे बोलली आणि हे प्रकरण मिटवायचे असल्यास पन्नास हजारांची मागणी केली. या प्रकरणी तिघां विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## "अंगाला हळद लावण्यापेक्षा कर्तृत्वाचा गुलाल लावलेला चांगला!" "भावाच्या शब्दांनी मिळाली उभारी आणि बहिण झाली अधिकारी!"

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील पिट्टी सारख्या छोट्याशा गावातील कोमल आप्पाराव भोंडवेची गोष्ट कोणालाही प्रेरणा देऊ शकते! "अंगाला हळद लावण्यापेक्षा कर्तृत्वाचा गुलाल लावलेला चांगला!" ह्या तिच्या भावाच्या शब्दांनी तिला एक नवा दृष्टिकोन दिला, आणि त्या शब्दांमुळेच तिने एमपीएससीच्या कठीण परीक्षेत यश संपादन केले. गावातील एका साध्या कुटुंबात वाढलेली कोमल, घराच्या सर्व जबाबदाऱ्या पार करत, एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित करत होती. "अधिकारी बनायचं!" आणि तिच्या मनात ठरलेलं तिने साध्यही केले. तिच्या भावाने नेहमी तिला सांगितलं, "मुलीचं कर्तृत्व तिच्या अंगाला लावलेल्या हळदी पेक्षा मोठं असायला हवं. आयुष्याला जिंकायचं असेल, तर कर्तृत्वाची फुलं उगवली पाहिजेत!" त्याच्या शब्दांनीच तिला पुढे जाऊन संघर्ष करण्याची आणि योग्य पद्धतीने जीवनाला आकार देण्याची प्रेरणा मिळाली. कोमलचं यश फक्त तिच्या कुटुंबाचं नाही, तर




संपूर्ण गावाचं आहे. तिच्या यशाचा उत्सव गावात मोठ्या उत्साहाने साजरा केला गेला. जीप मधुन मिरवणूक, टाळ्यांचा गजर, आणि गावकऱ्यांचा अभिमान या सगळ्याचं एकच कारण होतं, कोमलचं अथक परिश्रम आणि त्या वर मिळालेलं यश कोमल म्हणते, "स्वप्नं पाहणं, त्यांचं ध्येय ठरवणं आणि त्या साठी मेहनत करणं, हेच यशाचं गमक आहे. आणि भावाच्या शब्दांनी मला नेहमीच हे शिकवलं की, 'यश मिळवण्यासाठी मेहनत हीच खरी हळद आहे आणि कर्तृत्वाचा गुलाल चांगला!'"कोमलच्या यशाने एक गोष्ट स्पष्ट केली आहे. संघर्ष, धैर्य आणि कष्ट हेच यशाचे खरे शस्त्र आहेत."आज कोमलच्या यशाने साऱ्यांना हे सांगितलं की, संघर्षाचा मार्ग लांब असला तरी, कर्तृत्वाच्या मदतीने प्रत्येक युवक, प्रत्येक मुलगी, स्वप्नं पूर्ण करू शकते!"

## अखेर मुंगळा गाववासीयांच अवैध दारू बंद करण्याकरीता थेट मालेगाव पोलीस स्टेशनला उपोषणाच निवेदन.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार**

अवैध दारू विषयावर संबंधित विभाग कसा तोडगा काढणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. मुंगळा येथील कायमस्वरूपी दारू बंदी करण्यात करीता सामाजहिताची जान ठेवून सर्व मागण्या ३०एप्रिल पर्यंत पुर्ण कराव्यात अन्यथा नाईलाजाने संत गाडगेबाबा व्यसनमुक्ती विचार



मुंगळा गावात 100% कायमस्वरूपी दारूबंदी त्वरित लागू करावी.
मुंगळा बीट मधील अपयशी पोलीस कर्मचाऱ्यांची बदली तातडीने करावी.
दारूबंदी प्रतिबंधक कायद्यानुसार मुंगळा गावाचा समावेश करावा.

मंचचे संयोजक अनंता कुटे व महिला पुरुष सदस्याकडुन दिला उपोषणाचा इशारा

सविस्तर वृत असे की मागील अनेक वर्षांपासून संत गाडगेबाबा व्यसनमुक्ती विचार मंच व गावकऱ्याच्या वतीने निवेदनाद्वारे मागणी सुरू आहे. दारू विक्रेत्यांवर मालेगाव पोलीसांनी अनेक केसेस पण दाखल केल्या परंतु मुंगळा गावातील कायमस्वरूपी दारूबंदी पोलीस प्रशासन व उत्पादन शुल्क विभाग अजुनही करू शकले नसुन सर्व काही प्रसार माध्यमां मध्ये दररोज सदर वाजागाजा सुरू आहे. तरी मुंगळा गावाता आजही सकाळपासून खुलेआम अवैध गावरानी देशी दारू विकली जात आहे . ३०/४/२०२५ पर्यंत मुंगळा येथील कायमस्वरूपी दारू बंदी१००टक्के करावी तसेच मुंगळा बिट मधील सर्व पोलीस कर्मचारी दारू बंदी करण्यात अपयशी ठरले म्हणून त्यांची तडकाफडकी बदली करण्यात यावी. दारू बंदी प्रतिबंधक कायद्यानुसार मुंगळा गावाचा समावेश करून मुंगळा गावातील कायमस्वरूपी दारू बंदी समस्या कायमस्वरूपी सोडविण्यात यावी. वरील विषयावर गंभिर पणे विचार समाजहिताच्या वरील सर्व मागण्या ३०एप्रिल पर्यंत पुर्ण कराव्यात अन्यथा नाईलाजाने संत गाडगेबाबा व्यसनमुक्ती विचार मंचचे संयोजक अनंता दौलत कुटे व सर्व सदस्य व दारू पिडीत माता बघीनी ८/५/२०२५ पासुन तहसील कार्यालय मालेगाव किंवा मालेगाव पोलीस स्टेशन कार्यालया समोर तळतळत्या उन्हाळ्यात शांततेत उपोषणाला बसतील याची प्रशासनाने नोंद घ्यावी असी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.आता याकडे पोलीस प्रशासन उत्पादन शुल्क विभाग व प्रशासन काय तोडगा काढणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## रायगड जिल्हा परिषद शाळा विहीघर येथे विद्यार्थ्यांचा गुणगौरव


**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विहिघर येथील 32 मुले राज्यस्तरीय मंथन परीक्षेत बसली होती. पहिली ते चौथीपर्यंत असणाऱ्या विहिघर शाळेतील सर्व मुलांनी उत्तम कामगिरी केली आणि उत्तम गुण मिळवले. याबद्दल सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच रायगड टॅलेंट सर्च परीक्षेमध्ये रायगड जिल्ह्यातील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांमध्ये जुलै ते मार्च एप्रिलपर्यंत परीक्षा घेण्यात आल्या. अखेरच्या परीक्षेसाठी रायगड जिल्हा परिषद शाळा विहिघर येथील 18 पैकी नऊ मुले क्वालिफाय झाली त्यापैकी अखेरच्या परीक्षेत विहिघर शाळेतील नऊपैकी आठ मुले उत्तम गुणांनी पास झाली. त्यापैकी सात मुले पहिल्या 105 च्या यादीत आली. याबद्दल त्यांचा गुणगौरव करण्यात आला. या गुणगौरव कार्यक्रमासाठी माजी जिल्हा परिषद सदस्य विलास फडके यांनी ट्रॉफी आणि प्रमाणपत्रे दिली तसेच नामदेव शेठ फडके यांनी विद्यार्थ्यांना रोख रककमेचे बक्षीस दिले. तसेच केंद्रप्रमुख रंजना केणी यांनी या सात विद्यार्थ्यांना त्यांच्या




वतीने वस्तू भेट दिली तसेच नेरे केंद्राच्या वतीने सात विद्यार्थ्यांना एक पेन भेट देण्यात आला. संजय फडके यांनी आठ विद्यार्थ्यांना त्यांच्या वतीने बक्षीस भेट दिले. अशी उत्तम कामगिरी बजावल्याबद्दल सर्वांनी शिक्षकांचे कौतुक केले अशी संधी पुन्हा पुन्हा आम्हाला वारंवार मिळावी जेणेकरून आम्ही तुमचा सत्कार करू अशी नामदेवशेठ फडके यांनी सांगितले. तसेच विलास फडके यांनी शिक्षकांच्या उत्तम कामगिरीबद्दल प्रोत्साहनात्मक कार्य असल्याचे नमूद केले. याप्रसंगी नेरे केंद्राच्या केंद्रप्रमुख रंजना केणी यांनी तिन्ही शिक्षकांचा भेटवस्तू देऊन गौरव केला. यावेळी राऊत यांनी सर्व पालकांनी अशा स्पर्धा परीक्षांना बसवावे जेणेकरून आपल्या जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेतील मुलांचा शिक्षणाचा दर्जा उंचावेल यावर भर दिला. तसेच जिल्हा परिषद शाळांचा शिक्षणाचा दर्जा उंचावत आहे. मोठमोठ्या पदावर मुले सहजगत्या पात्र ठरत आहेत. आपल्याही गावातील मुलांनी अशी कामगिरी करावी यासाठी समाजाने शाळेत यावे आणि प्रोत्साहन द्यावे असे सुभाष भोपी यांनी सांगितले.

# चर्मोद्योगाची कोट्यवधींची उलाढाल!



बाजारहाट

## धारावीत स्वस्तात मिळतात चामड्याच्या वस्तू...

**तेजस वाघमारे / मुंबई**

बेल्ट, बूट, जॅकेट, पर्स अशा विविध चामड्याच्या आकर्षक वस्तू खरेदी करण्यासाठी ग्राहक धारावीतील लेदर वस्तूंची दुकाने आणि कारखान्यात गर्दी करत आहेत. धारावीतील याच बाजारपेठेतून देशविदेशात चामड्याच्या विविध वस्तूंची निर्यात होऊन बाजाराची वर्षिक कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते.

दुष्काळ आणि रोजगाराच्या शोधत विविध राज्यातील लोक धारावीत आले. त्यांनी परंपरागत व्यवसाय उपलब्ध साधनांच्या सहाय्याने सुरू केला. या वस्तूंना मागणी वाढल्याने व्यवसाय बहरत गेला. स्वस्त दरात आणि टिकाऊ वस्तू मिळत असल्याने ग्राहक थेट धारावीतील दुकाने आणि कारखान्यात येऊन वस्तू खरेदी करू लागले. कंपन्या कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त गिफ्ट देण्यासाठी विविध वस्तू धारावीतून खरेदी करू लागले. यामुळे धारावीतील लेदर व्यवसाय सर्वदूर पोहचला.



चर्मकार आणि संत ककय्या समाजातील लोकांनी धारावीत या व्यवसायाची सुरुवात केली. संत ककय्या समाजातील लोक चामडे कमवत, तर चर्मकार समाज त्यापासून विविध वस्तू बनवत. जागेअभावी आणि सरकारी अनास्थेमुळे कालांतराने येथील व्यावसायिक कानपूर, मद्रास, कोलकाता येथून तयार लेदर मागवू लागले. यासोबतच लेदर तयार करण्यासाठी यंत्र, कुशल कामगार मिळत नसल्याने धारावीतील व्यावसायिकांची कोंडी झाली. केवळ लेदर फिनिशिंग आणि त्यापासून वस्तू बनविण्याचे काम धारावीत मोठ्या प्रमाणात करण्यात येते. याठिकाणी तयार होणाऱ्या वस्तू देशविदेशात विक्री होत आहेत. आता या व्यवसायात उत्तर भारतीय लोक उतरल्याने ९९ टक्के व्यवसाय स्थानिकांच्या हातातून गेला आहे. धारावीत तयार होणाऱ्या वस्तू युरोप, आफ्रिका, अमेरिका अशा विविध देशात जातो. तसेच भारतातील विविध राज्यात देखील माल जातो. कामगार नसल्याने मराठी व्यावसायिक यामध्ये खूप कमी उरलेले आहेत.

या उद्योगाला सरकारकडून हवी ती मदत झाली नसल्याचे लेदर गुड मॅन्युफॅक्चर असोसिएशनचे (लिगमा) खजिनदार जितेंद्र शिंदे यांनी सांगितले.

- ऑफिस बॅग - १ हजार ८०० पासून ते ४ हजारांपर्यंत
- बेल्ट - 300 रुपयांपासून
- महिला पर्स - १,२०० पासून 3 हजारांपर्यंत
- प्रवासी बॅग - 3 हजार ते ८,५०० पर्यंत
- पुरुष पर्स - 300 रुपयांपासून सुरू
- जॅकेट - १० हजारांपासून सुरुवात

# अंधेरीतील आगीत महिलेचा मृत्यू

■ इमारतीला आग ■ सहाजण गंभीर



**मुंबई** : अंधेरी (पश्चिम) येथील लोखंडवाला परिसरातील एका इमारतीला शुक्रवारी मध्यरात्री २.४५ च्या सुमारास भीषण आग लागली. या दुर्घटनेत अभिना संजनवालिया या ३४ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला, तर अन्य सहाजण जखमी झाले. जखमींमध्ये एका १० दिवसांच्या चिमुकल्याचा समावेश आहे.

या दुर्घटनेत मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली असल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली.

अंधेरी (पश्चिम) येथील लोखंडवाला परिसरातील अशोक अकॅडमी लेनमधील आठ मजली इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील सदनिका क्रमांक १०४ मध्ये शुक्रवारी मध्यरात्री अचानक आग लागली. घरात धुराचे साम्राज्य पसरले. तोपर्यंत आगीचे लोळ इतर घरांमध्येही पसरले. रहिवाशांनी आरडाओरडा करत घराबाहेर पळण्याचा प्रयत्न केला. अनेकजण सुरक्षितरीत्या घराबाहेर पडले. मात्र, आग आणि धुरामुळे काही रहिवाशांना बाहेर पडता आले नाही. या आगीमध्ये अपर्णा गुप्ता (४१), दया गुप्ता (२१), रीहान गुप्ता (३), प्रदुमना (१० दिवस), अभिना संजय वालिया (३४), कार्तिक संजय वालिया (४०), पोलम गुप्ता (४०) आदी अडकले होते.

अग्निशमन दलाचे जवान तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. धुरामुळे अग्निशमन दलाच्या जवानांना मदतकार्यात अनेक अडचणींचा सामना करावा लागला.

मात्र, प्रयत्नांची पराकाष्ठा करत इमारतीत अडकलेल्या रहिवाशांना अग्निशमन दलाच्या जवानांनी बाहेर काढले. धुरात गुदमरल्यामुळे सर्वांना श्वास घेण्यास त्रास होत होता. त्यामुळे जखमींना नजीकच्या रुग्णालयांमध्ये नेण्यात आले. काहींना कोकिलाबेन तर काहींना कूपर आणि ट्रॉमा केअर रुग्णालयात नेण्यात आले. अभिना संजय वालिया यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. तर पोलम गुप्ता यांच्यावर उपचार करून त्यांना घरी सोडण्यात आले असून अन्य जखमींवर अद्यापही रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# नवकल्पनेसोबत वेव्हज् परिषदेत तंत्रज्ञानाचा महासागर

**मुंबई** : केंद्र सरकारच्यावतीने जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन क्षेत्राकरिता 'वेव्हज् २०२५ परिषद' मुंबईतील बीकेसी येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे होत आहे. परिषदेचे यजमानपद महाराष्ट्र शासन भूषवत आहे. १ ते ४ मे २०२५ या कालावधीत होत असलेल्या या परिषदेचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. मुंबईत होणाऱ्या या परिषदेस विविध देशांचे मंत्री, धोरणकर्ते, उद्योगपती तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

भारतामध्ये माध्यम आणि मनोरंजन उद्योग वेगाने वाढत असून रोजगारनिर्मितीसाठी या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होत आहे. ओटीटी, ॲनिमेशन, गेमिंग, व्हीएफएक्स, चित्रपट, संगीत आणि डिजिटल मीडिया क्षेत्रात देश प्रगती करत




आहे. या परिषदेत चर्चासत्रे, उद्योगक्षेत्रात गुंतवणूक आणि विविध कार्यक्रम होणार आहे.

परिषदेच्या पहिल्या दिवशी 'भारत व महाराष्ट्र पॅव्हिलियन' आणि वेव्हज प्रदर्शनाचे उद्घाटन होणार असून काही महत्त्वपूर्ण घोषणा व सामंजस्य करार (MOU) करण्यात येणार आहे. त्याचबरोबर क्रिएटोस्पिअरचे उद्घाटन आणि 'वेव्हज बझार', वेव्हज एक्सलेटर इत्यादींचा प्रारंभ होणार आहे. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी जागतिक मीडिया संवाद, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमध्ये संवाद तसेच क्रिएट इन इंडिया चॅलेन्जेसची अंतिम फेरी होणार आहे.

# एमएमआरडीएचे उत्पन्न वाढले

## प्रवासी भाड्याव्यतिरिक्त मिळणाऱ्या उत्पन्नात भर १२२ कोटी मिळाल्याने मेट्रोला पाठबळ

**मुंबई** : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) २०२४–२५ या आर्थिक वर्षात प्रवासी भाड्याव्यतिरिक्त मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये तिप्पट वाढ झाली आहे. प्रवासी भाड्याव्यतिरिक्त मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये १२२ कोटींची भरघोस वाढ झाली आहे. गेल्या वर्षीच्या ४२.५ कोटी उत्पन्नात यंदा थेट १८७ टक्के वाढ झाली आहे. या विक्रमी वाढीमुळे एमएमआरडीएने प्रवाशांना सुलभ सेवा देणारी मेट्रो व्यवस्था उभारण्याच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले आहे.

एमएमआरडीएचा एकूण ऑपरेशनल रेव्हेन्यू १९० कोटींवरून वाढून थेट २९२ कोटींवर पोहोचला आहे. म्हणजे आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला ठरवलेले २०० कोटींचे लक्ष्य मोठ्या फरकाने ओलांडण्यात आले आहे. २०२४–२५ या आर्थिक वर्षात नॉन-फेअर रेव्हेन्यूमध्ये ऑप्टिकल फायबर केबल परवाना शुल्क ६१.७२ कोटी, स्थानकांवरील जाहिराती २३.९५ कोटी, गाड्यांवरील (आतील आणि बाहेरील) जाहिराती ७.४७ कोटी, खाजगी रिटेल आऊटलेट्स आणि किऑस्क ८.२२ कोटी, स्थानक नामकरण व ब्रँडिंग अधिकार ९.७६ कोटी, कर्मचाऱ्यांचे कार्यक्षम व्यवस्थापन ५.४३ कोटी, टेलिकॉम इन्फ्रास्ट्रक्चर उत्पन्न ४.५२ कोटी इतर उत्पन्न (चित्रीकरणाची परवानगी, स्मॉल सेल, प्रमोशन्स) ०.६५ कोटी रुपयांचा समावेश आहे.

प्रवासी भाड्यांतून मिळणारे उत्पन्न १४७ कोटींवरून वाढून १७० कोटींवर पोहोचले असून, ही १५.६ टक्क्यांची वाढ आहे. यासोबतच नॉन-फेअर रेव्हेन्यू (तिकीटाव्यतिरिक्त मिळणारे उत्पन्न )मध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. त्यामुळे मेट्रोचे परवडणारे तिकिट दर कायम ठेवण्यास मदत होणार आहे.

> एमएमआरडीएच्या उल्लेखनीय आर्थिक कामगिरीतून महाराष्ट्राला कार्यक्षम, सर्वसमावेशक आणि शाश्वत शहर वाहतुकीचा आदर्श बनवण्याचे आमचे उद्दिष्ट अधोरेखित होते. नवकल्पनांवर आधारित मॉनिटायझेशन (उत्पन्ननिर्मिती) आणि कार्यक्षम संचालनाच्या माध्यमातून आम्ही जागतिक दर्जाची आणि प्रवाशांना प्राधान्य देणारी मेट्रो व्यवस्था विकसित करत आहोत.
>
> - **देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री



> नॉन-फेअर रेव्हेन्यूमधील तिप्पट वाढ हे आर्थिक यश तर आहेच, त्याचप्रमाणे सातत्याने प्रगती करणारी, आधुनिक मेट्रो व्यवस्था उभारण्याच्या आमच्या व्हिजनचे द्योतक आहे. मुंबईकरांसाठी भक्कम पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या आणि शहरी जीवनमानाचा दर्जा वाढविण्याच्या एमएमआरडीएची दृढ बांधिलकी यातून दिसून येते.
>
> - **एकनाथ शिंदे**, उपमुख्यमंत्री

# दिलीप आमले यांचा व्यसनमुक्ती जनजागृती आणि सामाजिक कार्याची दखल घेत वारकरी संप्रदायाच्या वतीने आदर्श रायगड भुषण पुरस्कार

दैनिक युवक आधार
नेरुळ वार्ताहर

कीर्तनकार हभप अक्षय महाराज भोसले,नामदार श्री.भरतशेठ गोगावले,आकाश महाराज भोंडवे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आला शिव पुण्य श्लोक ३४५ पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम किल्ले श्री रायगड या पवित्र ठिकाणी वारकरी धार्मिक सामाजिक तसेच गेल्या २ दशके व्यसनमुक्ती जनजागृती मोफत अभियान राबविण्यात देवदुत गोरगरीबाचे संसार व्यसनाधीन लोकमुळे रसातळाला जातात म्हणून व्यसनमुक्त जिवन काळाची गरज धेय्य उराशी बाळगून कुठल्याही आर्थिक सहकार्यची अपेक्षा न बाळगता व्यसन मुक्त राहावे म्हणून नागरिक युवक यांच्या बरोबर संवाद मार्गदर्शन करणारे श्री दिलीप किसनराव आमले (आपला माणूस) अध्यक्ष शिव वाहतूक सेना नवी मुंबई यांना रायगड भुषण वारकरी संप्रदायाच्यावतीने आदर्श रायगड भूषण व्यसनमुक्ती जनजागृती पुरस्कार शाल श्रीफळ मानपत्र सन्मानचिन्हे नामदार श्री एकनाथजी शिंदे साहेब उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या अत्यंत जवळचे वारकरी संप्रदायातील किर्तनकार हभप अक्षय महाराज भोसले अध्यक्ष आध्यात्मिक



वारकरी सेना महाराष्ट्र राज्य , नामदार श्री भरतंशेठ गोगावले साहेब ,रोजगार हमी फलोत्पदन खार भुमी मंत्री महाराष्ट्र राज्य, रायगड पुत्र हभप आकाश महाराज भोंडवे यांच्या शुभहस्ते यावेळी २२ जिल्ह्यातील हजारो शिवभक्त रायगड किल्ला येथे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाचे २७ रोजी रत्नागिरी येथे अधिवेशन

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**
**चिपळूण (प्रतिनिधी):--**

अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे २७ रोजी सकाळी ९ ते १ या वेळेत रत्नागिरी येथील स्वयंवर मंगल कार्यालय येथे अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनाचे उद्घाटन रविवार दिनांक २७ रोजी सकाळी ११ वाजता राज्याचे उद्योगमंत्री तथा पालकमंत्री ना. उदय सामंत यांच्या हस्ते होईल. यावेळी गृहराज्यमंत्री ना. योगेश कदम प्रमुख अतिथी असणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष प्रवीण काटकर हे असणार आहेत. तर यावेळी आ. भास्कर, जाधव, आ. शेखर निकम, आ. किरण सामंत, शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य अध्यक्ष देविदास बसवदे, राज्यचिटणीस कल्याण लवांडे, मुख्य कार्यकारी अधिकारी वैदेही रानडे, शिक्षणाधिकारी बी. एम. कासार आदी उपस्थित राहणार आहेत. नंतर आदर्श शाळा, आदर्श शिक्षक यांच्या सन्मान होणार आहे. मान्यवरांची मनोगते होतील. दुपारी १२.३० ते १.३० वाजता संघटनात्मक व प्रशासकीय कामांविषयी मार्गदर्शन होईल. दुपारी २ .३० ते ३.३० वाजता राज्य पदाधिकारी मार्गदर्शन करतील. नंतर अध्यक्षीय भाषण व अधिवेशनाचा समारोप होईल. जास्तीत जास्त शिक्षकांनी सदर अधिवेशनास उपस्थित राहावे असे आवाहन संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रवीण काटकर, उपाध्यक्ष दिलीप देवळेकर, सरचिटणीस श्री. देवघरकर यांनी केले आहे.

अधिवेशनाच्या निमित्ताने काही मागण्या या संघटनेने केल्या आहेत. यामध्ये १५ मार्च २०२४ संचमान्यता शासन निर्णय रद्द करणे. शिक्षण सेवक पद रद्द करणे. जुनी पेन्शन योजना लागू करणे. कंत्राटी शिक्षकांना पुनर्नियुक्ती देणे. अशैक्षणिक कामातून शिक्षकांची मुक्तता करणे. रिक्त प्रशासकीय पदे लवकरात लवकर भरणे. MSCIT च्या कपातीसंदर्भातील शासन निर्णय रद्द करणे. या मागण्यांचा समावेश आहे.

# माहुल गावातील घरे बनली पालिकेसाठी डोकेदुखी

## सर्व कर्मचाऱ्यांना घर विकत घेण्याची संधी

**मुंबई** : चेंबुर येथील माहुल गावातील प्रकल्प बाधितांची धूळखात पडलेली घरे विक्री करणे पालिकेसाठी डोकेदुखी बनले आहे. महापालिकेच्या तृतीय आणि चतुर्थ श्रेणीतील कामगारांनी अल्प प्रतिसाद दाखविला असून, यासाठी पालिकेने जुन्या अटीमध्ये बदल करून पालिकेच्या वर्ग १ व्यतिरिक्त इतर सर्व श्रेणीतील कर्मचाऱ्यांना सदनिका विकत घेता येईल, असे नवीन परिपत्रक नुकतेच काढले आहे. याकरिता अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख १५ मे २०२५ पर्यंत करण्यात आली आहे.

माहुल गाव येथील एवर स्माईल पी.ए.पी. संकुल, माहुल गाव आंबा पाडा आणि एस.जी.केमिकल व्हिडिकॉन अतिथी आदीं ठिकाणी प्रकल्प बाधितांची १३ हजार घरे रिक्त आहेत. यामुळे त्यांची देखभाल आणि दुरूस्तीसाठी महापालिकेला आर्थिक खर्च करावा लागत असून पालिकेच्या महसूलांवर अतिरिक्त ताण पडत आहे. यासाठी महापालिकेने ९ हजार ९८ घरे विक्रीसाठी काढली आहेत. यामधील एका सदनिकाची किंमत १२.५० लाख रुपये ठेवण्यात आल्याचा निर्णय मुंबई महापालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी २५ फेब्रुवारी २०२५ रोजी घेतला होता. परंतु १५ एप्रिल २०२५ रोजी केवळ १९९ कर्मचाऱ्यांचे अर्ज दाखल झाले होते. या अल्प प्रतिसादामुळे पालिकेने आता आपल्या अटी व शर्तीमध्ये बदल केला आहे.



### नवीन अटी

- कर्मचारी निवासस्थानात राहणारे महापालिकेचे कर्मचारीसुद्धा सदर सदनिका खरेदी करू शकतो.
- एक किंवा दोन सदनिका खरेदी करू शकतात.

### प्रस्तावित अट

- कर्मचारी निवासस्थानात राहणारे महापालिका कर्मचाऱ्यांना माहुलची घरे विकत घेण्यासाठी पात्र असतील, परंतु कर्मचाऱ्यांना सध्याच्या योजनेत सदनिका वाटप झाल्यास कर्मचाऱ्यांना निवासस्थान रिक्त करावे लागेल.

### या सुविधा मिळणार

- माहुल गावातील प्रत्येक सदनिकांचे चटई क्षेत्रफळ २२५ चौरस फूट आहे.
- ईस्टर्न फ्रीवे आणि सायन –पनवेल महामार्ग जवळ उत्कृष्ट कनेक्टिव्हिटी तसेच सार्वजनिक वाहतूक (मोनोरेल स्टेशन, बेस्ट बस मार्ग) सहज उपलब्ध
- पार्किंग, मलनिस्सारण प्रक्रिया प्रकल्पाची सोय
- क्रीडांगण, मुंबई पब्लिक स्कूल, मार्केट आणि नियोजित प्रसूती रुग्णालय यांचा समावेश

# पहलगाम हल्ल्यातील शहीदांना वाशी सेक्टर २९ मधील राजीव गांधी उद्यानात भावपूर्ण श्रद्धांजली

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

वाशी, प्रभाग क्रमांक ५४ – जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड आणि अमानुष हल्ल्यात शहीद झालेल्या निष्पाप नागरिकांच्या स्मृतीप्रित्यर्थ वाशीतील राजीव गांधी उद्यानात एक भावपूर्ण श्रद्धांजली समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे आयोजन माजी नगरसेवक शशिकांत राऊत, माजी नगरसेविका सुनंदा राऊत आणि स्थानिक रहिवाशांच्या वतीने करण्यात आले होते.कार्यक्रमावेळी उपस्थित नागरिकांनी एकत्र येत, देशावर आलेल्या या दुःखद प्रसंगाविरुद्ध आपल्या भावना व्यक्त करत, दहशतवादाच्या निर्घृण कृत्याचा तीव्र शब्दांत निषेध केला. "देशाचे निष्पाप नागरिक जे निर्दोषपणे या क्रौर्याचा बळी ठरले, त्यांचे बलिदान कधीही व्यर्थ जाणार नाही," असे आश्वासक उद्‌गार यावेळी उपस्थितांनी व्यक्त केले. शहिदांच्या पवित्र स्मृतीप्रति आदर व्यक्त करताना उपस्थितांनी दीर्घ मौन पाळले



आणि मेणबत्त्यांच्या उजेडात श्रद्धेचे दिप पेटवले. "ईश्वर शहीदांच्या आत्म्यास शांती देवो आणि त्यांच्या परिवाराला या अपरिमित दुःखातून सावरण्याची शक्ती प्रदान करो," अशी सामूहिक प्रार्थना करण्यात आली. संपूर्ण वातावरण राष्ट्रभक्तीने भारलेले होते, आणि प्रत्येकाच्या डोळ्यांत आपल्या शहीद बांधवांसाठी आदरयुक्त अश्रू झळकत होते.

या श्रद्धांजली कार्यक्रमाने वाशीकरांनी एकत्र येऊन, संपूर्ण देशवासीयांच्या भावना व्यक्त करत, दहशतवादाविरोधात एकजूट दाखवली. "आपल्या देशाच्या सुरक्षेसाठी बलिदान देणाऱ्यांच्या शौर्याला आमची सलाम," असा निर्धार उपस्थित प्रत्येक नागरिकाने व्यक्त केला.

# सणसर येथे आंबेडकर जयंती निमित्त महाआरोग्य शिबीराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 134 व्या जयंतीनिमित्त भवानीनगर येथील प्रसिद्ध चिंतामणी हॉस्पिटल व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी यांच्या संयुक्तपणे सणसर येथील लूंबिनी बुद्धविहार येथे रविवारी दि. 27 रोजी बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून महाआरोग्य शिबिरास सुरवात करण्यात आली.या मोफत सर्वरोग निदान शिबिरात जवळपास 150 रुग्णांची तपासणी करण्यात आली.यावेळी चिंतामणी हॉस्पिटल भवानीनगरचे डॉ. आकाश जांबले,डॉ.अंजली सोरटे डॉ.योगेश जाधव व सर्व स्टाफ उपस्थित होता.डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती कमिटीच्या वतीने माजी सरपंच पांडुरंग निंबाळकर,पोलीस पाटील राजेंद्र चव्हाण,युवा उदयोजक अध्यक्ष यात्रा कमिटी अक्षय निंबाळकर,माजी अध्यक्ष नितीन नाना निंबाळकर सत्कार करण्यात आला. यावेळी जयंती अध्यक्ष शांताराम चव्हाण,उपाध्यक्ष अनिल नवले,खजिनदार सुनील लोंढे,विराज चव्हाण,माजी उपसरपंच दिपक चव्हाण,भागवत चव्हाण,रामदास चव्हाण,राहुल सोनवणे,महादेव चव्हाण व सर्व सदस्य उपस्थित होते



केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) परीक्षेत देशात ६५३ वी रँक प्राप्त करून पाटोदा तालुक्याचे नाव उंचावणारे भूमिपुत्र डॉ.पंकज नारायण आवटे यांचा सन्मान करून शुभेच्छा देताना. आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्विय सहाय्यक तथा पाटोदा तालुका पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष सोमिनाथजी कोल्हे, पाटोदा नगर पंचायतचे माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक पठाण नय्युम भाई व इतर

**(छाया- दैनिक युवक आधार पाटोदा)**